## राष्ट्रपती आज कोल्हापूर दौऱ्यावर

**मुंबई :** भारताच्या राष्ट्रपती द्रोपती मुर्मू सोमवारी (दि. २) कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. यादरम्यान, राष्ट्रपती करवीर निवासिनी अंबाबाई देवीचे दर्शन घेणार आहेत. त्यासाठी शहरातील वाहतुकीत मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला आहे. देवीच्या दर्शनासाठी राष्ट्रपती द्रोपती मुर्मू या अंबाबाई मंदिरात येणार असल्याने भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी त्यांनी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मंदिरात येणं टाळावं, असे आवाहन देवस्थान प्रशासनाकडून भाविकांना करण्यात आले आहे. दरम्यान, मंदिर परिसरातील पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

रायगड, सोमवार, दि. २ सप्टेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## सर्वोच्च न्यायालयाला नवा ध्वज

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाला नवीन ध्वज आणि चिन्ह मिळाले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रविवारी (दि. १) सर्वोच्च न्यायालयाच्या नवीन ध्वज आणि चिन्हाचे अनावरण केले. नवी दिल्ली येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी यांनी न्याय आणि लोकशाहीचे प्रतीक असलेला हा नवा ध्वज आणि चिन्हाची कल्पना सादर केली आहे. या नवीन ध्वजात अशोक चक्र, सर्वोच्च न्यायालयाची इमारत आणि संविधानाचे पुस्तक दाखवण्यात आले आहे.

**आजचा अग्रलेख**
**उत्तरेतील निवडणुका**

### वेधक

## अपघातात एक जागीच ठार

**खोपोली :** मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवर पहाटे एका आयसर टेम्पोने समोरील टेम्पोला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून, या अपघातात क्लीनरचा जागीच मृत्यू झाला आहे. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरून पुण्याहून मुंबईकडे माल घेऊन जात असताना तो बोरघाटात ढेकू हद्दीत आला असता आयसर टेम्पो (केए-२५एबी ४२१२) चालक संतोष पटकन शेट्टी (२७) रा. धारवाड-कर्नाटक हा घेऊन आला असताना त्याचे टेम्पोवरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील दुसऱ्या लेनवर चालणाऱ्या भारत बेंज टेम्पोला (एमएच १० डीटीव्ही ५१९९) जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात टेम्पोची केबिन पूर्णपणे दबल्याने त्यात अडकून क्लीनर गुरुसिदा (२५) याला गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला आहे.

## विमानात बॉम्ब ठेवल्याची धमकी

**नागपूर :** काही दिवसांपूर्वी एअर इंडियाच्या विमानात बॉम्ब ठेवल्याची धमकी आली होती. आता इंडिगोच्या विमानात बॉम्बची धमकी आली. यामुळे मध्य प्रदेशातील जबलपूर येथून हैदराबादला जाणाऱ्या विमानाचे नागपूर विमानतळावर आप्तकालीन लँडींग करण्यात आले. इंडिगोच्या अधिकाऱ्यांनी रविवारी ही माहिती दिली. विमानातील सर्व प्रवासी सुरक्षित आहेत. विमान नागपूरला उतरवल्यानंतर कठोर तपासणी करण्यात आली. त्यात काहीच आढळून आले नाही. आता धमकी देणाऱ्या व्यक्तीचा पोलीस शोध घेत आहेत.

# शेतकऱ्यांना ‘पटणी’ची पॉवर

## संपादित जमीन परत मिळण्याचा मार्ग मोकळा

आविष्कार देसाई
| रायगड |

**अलिबाग तालुक्यातील मेढेखार येथील पटणी एनर्जी प्रा.लि.ने खरेदी केलेली ८९ हेक्टर जमीन शेतकऱ्यांना मूळ किमतीमध्ये परत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जमीन खरेदी करुन तिचा औद्योगिक कारणासाठी वापर निर्धारीत कालावधीत न केल्याने रायगड जिल्हा प्रशासनाने ती जमीन शेतकऱ्यांना परत करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे श्रमिक मुक्ती दलाने १२ वर्षांपूर्वी उभारलेल्या लढ्याला यश आले आहे. या निर्णयाचे मेढेखार आणि शहाबाजमधील शेतकऱ्यांनी स्वागत करुन श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर यांना धन्यवाद दिले आहेत.**

- **जिल्हा प्रशासनाने दीड वर्षापूर्वीच केले होते आदेश पारीत**
- **श्रमिक मुक्ती दलाच्या १२ वर्षांच्या विराट संघर्षाला यश**

यातील गंभीर बाब म्हणजे, प्रशासनाने १२ जानेवारी २०२३ रोजीच आदेश पारीत केले आहेत. मात्र, याची माहिती शेतकऱ्यांना आता मिळाली आहे. गेल्या दीड वर्षाहून अधिक काळ ही महत्त्वाची माहिती प्रशासनाने का दडवून ठेवली याचा उलगडा होणे गरजेचे आहे. २००६ साली देशामध्ये पान २ वर


### स्थानिक प्रशासनाने अहवाल दडवला

यातील गंभीर बाब म्हणजे, प्रशासनाने १२ जानेवारी २०२३ रोजीच आदेश पारीत केले आहेत. मात्र, याची माहिती शेतकऱ्यांना आता मिळाली आहे. गेल्या दीड वर्षांहून अधिक काळ ही महत्त्वाची माहिती प्रशासनाने का दडवून ठेवली याचा उलगडा होणे गरजेचे आहे.





डॉ. भारत पाटणकर



“शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी सुरु केलेली लढाई आता जिंकलो आहोत. खूप आनंदाचा क्षण आहे. केवळ जिद्द, चिकाटी आणि डॉ. भारत पाटणकर यांच्या मार्गदर्शनामुळे हे शक्य झाले आहे. प्रशासनाने जमिनी घेताना नोटीस बजावल्या होत्या. तशा प्रत्येक शेतकऱ्यांना जमीन परत करत असल्याची प्रत मिळणे गरजेचे आहे. पुढे काय करायचे, जमिनीची रक्कम कोठे, कशी भरणा करायची याबाबत लवकरच बैठक घेण्यात येईल.”
– राजन भगत, श्रमिक मुक्ती दल, रायगड

“शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी आता परत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी हा आनंद उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. सदरची लढाई ही स्थानिक शेतकरी आणि श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर यांच्यामुळेच शक्य झाले आहे. डॉ. पाटणकर यांचा ४ सप्टेंबर रोजी ७५वा वाढदिवस खासदार शरद पवार यांच्या उपस्थितीत कोल्हापूर येथे साजरा करण्यात येणार आहे. त्याच कार्यक्रमात या आदेशाची प्रत डॉ. पाटणकर यांना देण्यात येऊन लवकरच विजयी मेळावा घेण्यात येईल.”
– राजेंद्र वाघ, श्रमिक मुक्ती दल, रायगड

# प्रदूषणाबाबत चिंता व्यक्त

### पनवेल पालिकेचा पर्यावरण अहवाल जाहीर



| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

पालिकेचा २०२३-२४ या वर्षाचा सद्य:स्थितीतील पर्यावरणाचा अहवाल वेळेत जाहीर करण्यात आला आहे. आयआयटी-बीने तयार केलेल्या या अहवालात तळोजा आणि कासाडी नद्यांचे प्रदूषण आणि हरितपट्ट्यात झालेली घट यावर गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. शहराचा विकास अधिकाधिक पर्यावरणपूरक व्हावा, तसेच शहरातील प्रदूषण व पर्यावरणीय समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी प्रदूषणाच्या सद्य: स्थितीचा अहवाल महत्त्वाची भूमिका बजावत असतो.

पालिका हद्दीतील पर्यावरणाची सद्य:स्थिती दाखवणारा अहवाल दरवर्षी ३१ जुलैपर्यंत पान २ वर

### महामार्गाच्या दुतर्फा झाडे लावा

**अहवालाच्या निष्कर्षानुसार महामार्गाच्या कडेला आणि इतरत्र वृक्षलागवड करून हवेतील घातक घटक कमी केले जाऊ शकतात. तसेच महामार्गाच्या दुतर्फा झाडे लावल्याने ध्वनीप्रदूषणही कमी होईल.**

“पालिकेच्या सद्य:स्थितीच्या अहवालात प्रदूषणाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. मात्र, प्रदूषण कमी करण्यासाठी काय करायला हवं हे सुचवण्यात आलेले नसून, हा अहवाल परिस्थितीची माहिती न घेता कार्यालयात बसून बनवल्यासारखा वाटत आहे.”
– अरविंद म्हात्रे, माजी नगरसेवक, शेकाप

# ‘मविआ’कडून सरकारविरोधात ‘जोडे मारो’

| मुंबई | प्रतिनिधी |

मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी भ्रष्टाचारी महायुती सरकारचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीकडून रविवारी (दि. १) हुतात्मा चौकापासून गेट वे ऑफ इंडियापर्यंत मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकरली होती. मात्र, हा मोर्चा सुरू होण्याआधी या मोर्चाला परवानगी देण्यात आली. फोर्ट येथील हुतात्मा स्मारक चौक येथे अभिवादन करून गेट वे ऑफ इंडिया येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ ‘शिवद्रोही’ सरकारला ‘जोडे मारो’ पान २ वर




### सरकारची कमिशनखोरी : पटोले

राज्यात देशात शिवद्रोही सरकार आहे. महाराजांच्या नावाने पेशवाई सुरू आहे. कमिशनखोरी आणि भ्रष्टाचार केला. महाराजांचा अपमान करण्याचं काम सरकारने केलं. मालवणमध्ये महाराजांचा पुतळ पडला. तो फक्त महाराजांचा पुतळा नव्हता, तर महाराष्ट्राचा धर्म होता. शिवाजी महाराज आमचे दैवत आहे. महाराजांचा अवमान करणाऱ्या सरकारच्या विरोधात आम्ही आंदोलन करत आहोत, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले.

### सरकारच्या भ्रष्टाचाराचा नमुना : पवार

मालवणमधील शिवाजी महाराजांचा उभारण्यात आलेला पुतळा म्हणजे महायुती सरकारचा भ्रष्टाचाराचा नमुना असल्याचा हल्लाबोल शरद पवार यांनी केला. महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करण्याची भूमिका राज्यकर्त्यांनी केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाऱ्यामुळे शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याचे धक्कादायक विधान केले. राज्यभरात असलेले शिवाजी महाराजांचे पुतळे लोकांना प्रेरणा देत असतात. परंतु, मालवणमध्ये उभा केलेला पुतळा भ्रष्टाचाराचा नमुना आहे. तो पुतळा उभारण्यात भ्रष्टाचार झाला आहे. हा जनमानसात समज निर्माण झाला आहे.

# भाजपाच्या पदाधिकाऱ्याला चोप

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

बारमध्ये असलेल्या मुलीला शेंगदाणा मारल्याने खांदा कॉलनी येथे राहणाऱ्या ४८ वर्षीय भाजपाच्या पदाधिकाऱ्याला मारहाण करण्यात आली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात केवळ अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात आहे.

पनवेलमधील भाजपाच्या पदाधिकाऱ्याला लेडीज बारमध्ये मारहाण करण्यात आली. मारहाणीत जखमी झालेला पदाधिकारी त्याच्या

### बारमधील मुलीला मारला शेंगदाणा

मित्रासोबत पनवेल तालुक्यातील मून लाईट बार (कोळखे) मध्ये मंगळवारी दारू पिण्यासाठी गेला होता. यावेळी काही महिला बारमध्ये गाण्यावर नृत्य करत होत्या. बारमध्ये मद्य प्यायल्यानंतर या पदाधिकाऱ्याने बारबालेच्या दिशेने शेंगदाणा भिरकावला. यावेळी संतप्त झालेल्या बारमालकाने बाऊन्सर आणि वेटरच्या सहाय्याने त्याला चांगलाच चोप दिला.

**पनवेल तालुक्यातील बारमध्ये बलात्काराच्यादेखील घटना घडलेल्या आहेत, तर काही महिन्यांपूर्वी बारमध्ये गोळीबारदेखील करण्यात आला होता. त्यामुळे मंगळवारी झालेल्या या मारहाणीकडे पोलिसांनी दुर्लक्ष करता कामा नये.**

या मारहाणीत हा पदाधिकारी जखमी झाला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला.

# करंजा बंदर फिशिंग हार्बर करणार : फडणवीस

| चिरनेर | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील करंजा येथे एक हजार मच्छिमार बोटी क्षमतेचे बंदर उभारणीच्या कामाला गती देण्यात येणार असून, त्यासाठी १५३ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय याठिकाणी अत्याधुनिक अशी जेटी तयार करण्यात येणार असून, हे बंदर देशातील सर्वात मोठे फिशिंग हार्बर म्हणून विकसित करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे



प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

उरण नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारत, सावित्रीबाई फुले फुल मार्केट आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन आणि समाज विकास पान २ वर

# दांडगुरीत बिबट्याची दहशत

| बोर्लीपंचतन | वार्ताहर |

श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धन दांडगुरी बोर्ली रोडला वावेपंचन बसस्थानकाच्या पुढे शनिवारी (दि. ३१) रात्री दहा वाजता रस्त्यावर दोन बिबट्याचे दर्शन घडले. एक कार श्रीवर्धनहून बोर्लीपंचतनकडे प्रवास करीत असताना त्यातील



बसलेल्या व्यक्तींनी बिबट्या पाहिला व मोबाईलद्वारे छायाचित्रण केले. नागरिकांनी बिबट्यापासून सावधगिरी बाळगावी म्हणून बिबट्याचे छायाचित्र सोशल मीडियाद्वारे प्रसारित करण्यात आले. अशीच घटना काही महिन्यांपूर्वी दांडगुरी हद्दीतही घडली पान २ वर

# गणेशभक्तांसाठी ३४२ स्पेशल ट्रेन

| मुंबई | प्रतिनिधी |

गणेशोत्सव आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. बाप्पाच्या आगमनाचे वेध लागले असताना चाकरमान्यांचे अर्धे लक्ष हे तिकिटांच्या वेटिंग लिस्टवर असते. कोकणात जाण्यासाठी तिकीट मिळणं हे खूप कठीण आहे. गणेशभक्तांसाठी रेल्वेने मोठं गिफ्ट दिलं आहे. कोकणात जाण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून ३४२ स्पेशल ट्रेन चालवण्यात येणार आहेत. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली आहे. गणेशोत्सवासाठी गावाला जाण्यासाठी लाखो चाकरमानी कित्येक महिने आधीच रेल्वेच्या तिकिटांचे बुकिंग करुन ठेवतात. मात्र, कितीही आधी बुकिंग करायचं ठरवलं तरीदेखील वेटिंगवर दाखवतं. सगळ्या रेल्वे गाड्यांचे बुकिंग फुल्ल असतात. अशावेळी चाकरमान्यांकडे खासगी वाहनांचाच पर्याय उरतो. पान २ वर






# माथेरान प्रवासी कर संकलन ठेक्याचा लिलाव

## बाईक हॉस्पिटॅलिटी कंपनीने मिळविला ठेका

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरात प्रवेश करणाऱ्या पर्यटकांकडून शहरात प्रवेश करण्यासाठी प्रवासी आणि स्वच्छता कर आकारला जातो. प्रवासी कर संकलन करण्याचा ठेका लिलावात दि बाईक हॉस्पिटॅलिटी कंपनीने मिळविला आहे. या कंपनीने स्पर्धक दोन कंपन्यांना मागे टाकत १३ कोटी २१ लाखांना हा प्रवासी कर संकलनाचा ठेका मिळविला.


२०२४ ते २०२६ या कालावधीत माथेरान शहरात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांकडून प्रवासी आणि स्वच्छता कर वसूल केला जातो.




या निधीमधून माथेरान नगरपरिषद शहरातील विकासकामे करीत असतात. माथेरान पालिकेकडून मागील दीड वर्षे प्रवासी कर संकलन करीत होते. त्यामुळे पालिकेने जुलै २०२४ मध्ये निविदा काढली होती. त्यांनतर या निविदेनुसार २९ ऑगस्ट रोजी लिलाव सुरू झाला. हा ठेका मिळविण्यासाठी माथेरान पालिकेकडे विकास कन्स्ट्रक्शन, फायरविंग इन्फ्राकॉन सर्व्हिसेस आणि दि बाईक हॉस्पिलिटी या कंपन्यांनी सहभाग घेतला होता.

बोलीमध्ये बाईक हॉस्पिटॅलिटी ही कंपनीने लावलेली १३ कोटी २० लाख ८० हजार ही बोली सर्वाधिक ठरली. त्यामुळे या कंपनीला माथेरान नगरपरिषदेमधील प्रवासी कर संकलनाचा ठेका मिळविला.

> माथेरान नगरपरिषदेमधील प्रवासी कर संकलनाचा ठेका २०१९ मध्ये बाईक हॉस्पिटॅलिटी कंपनीने मिळविला होता. त्यावेळी कंपनीकडील ६१ लाख रुपये अनामत रक्कम असल्याने ती जप्त करून थकीत रक्कम ११ लाख रुपये शिल्लक राहिली होती. हॉस्पिटॅलिटी कंपनीने थकीत रकमेचा धनादेश जुलैअखेरीस पालिकेकडे दिला आणि प्रवासी कर निविदेत सहभाग घेतला. त्यामुळे पालिकेने या कंपनीला लिलावामध्ये सहभागी करून घेतले होते.
> – अंकुश ईचके, रोखपाल



# मातृदेवता पिठोरी

सर्व मंगल मांगल्ये शिवे सवार्थ साधिके शरण्ये त्र्यबंके गौरी नारायणी नमोस्तुते अशा प्रकारचे वर्णन देवी पार्वतीचे पुराणानुसार केले आहे. श्रावण अमावस्येतील मातृदेवता म्हणजे पिठोरी ही यावेळी सोमवार, दि. २ सप्टेंबर रोजी स्थानापन्न होणार आहे. ही देवता जलदेवता, निसर्ग देवता, वनदेवता म्हणून समजली जाते. ही पिठोरी श्रावण कृष्ण अमावस्या या दिवशी येते. म्हणून श्रावणातील अमावस्येला पिठोरी अमावस्या म्हणतात.

आदिवासी बांधव जंगलात रानावनात राहतात. तिथे त्यांना वाघापासून भीती वाटायची. देवी पार्वतीचं वाहन वाघ. या वाघापासून देवीने त्यांचे संरक्षण करावे म्हणून आदिवासी बांधव तेरड्याची फ ुले नदी किनारीवरील लव्हाळा व नागवेलीचे फूल यांची पिठोर मांडून तिला पुजू लागले. तेरडे हे तांबडे गुलाबी, लाल, निळे, जांभळे, पांढरे या रंगाचे असतात. ते रानात, पाणवठ्यावर गावकुसावर उगवतात. इव्हाळा म्हणजेच पिठोरीचा भाऊ त्याला पिठोरीचा मुल्हारी असे म्हटले जाते.

पिठोरीचा सण हा खऱ्या अर्थाने महिलांचा सण असतो. महिला पिठोरीच्या पाया पडल्यावर म्हातारी आजी तिला सेस देते. सेस म्हणजे तेड्याचा पान व फूल आणि तांदळाचे दाणे. हे तांदळाच्या टाकीत तसेच पूर्वी गुरांच्या गोठ्यात टाकायला सांगे. हेतू एवढाच, शेती व गुरढोर यांची भरभराट व्हावी. पिठोरीचा प्रसाद म्हणजेच जेवण घेतल्यावर पारंपरिक नाच, खेळ, फुगड्या, उखाणे रंगतात, भजन होते. रात्री १२ वाजता पिठोरी आरती होते. त्यानंतर तेरडे म्हणजेच पिठोरी सुपात घेऊन महिला ते सूप डोक्यावर घेतात. भगिनी पारंपरिक गाणे म्हणतात. जशी निसर्गात ही पिठोरी तेरड्याच्या रुपाने निर्माण झाली, ती पाण्यातून त्याच जलात ही निसर्ग देवता, वनदेवता ओहळात, नदीत, खाडीत, तळ्यात विसर्जित करतात. आणि, पुढल्या वर्षापर्यंत या मातृदेवतेची वाट पहातात.

**- देविदास म्हात्रे,** पेण

पान १ वरून

## शेतकऱ्यांकडे ‘पटणी’ची पॉवर

विशेष आर्थिक क्षेत्राच्या (सेझ) नावाखाली शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनींची लूट सुरु होती. एकट्या रायगड जिल्ह्यामध्ये तब्बल २६ सेझ प्रस्तावित करण्यात आले होते. त्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांच्या लाखो हेक्टर पिकत्या जमिनी उद्योजकांच्या घशात जाणार होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने रिलायन्स आणि टाटाच्या औष्णिक ऊर्जा प्रकल्पाचा समावेश होता. तसेच पटणी एनर्जीनेदखील शहाबाज आणि मेढेखार येथे प्रकल्प उभारण्याच्या हालचाली केल्या होत्या.

२००६ पटणी एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड मुंबई यांनी विकास आयुक्त उद्योग यांची परवानगी घेऊन खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी जमिनी खरेदी केल्या होत्या. विकास आयुक्तांनी सदरच्या जमिनी आदेश दिनांकापासून पाच वर्षांच्या आत खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरात आणण्याचे निर्देश दिले होते. त्याचबरोबर जर त्या वापरात आणल्या नाहीत, तर मूळ मालकास मूळ किमतीला परत देण्याची अट घातली होती.

नोकरी मिळेल या आशेने सुमारे १६९ शेतकऱ्यांनी ८९ हेक्टर जमिनी सन २००६ ते २००८ या कालावधीत विकल्या होत्या. एक लाख ६२ हजार ते तीन लाख रुपये असा दर तेव्हा शेतकऱ्यांना मिळाला होता. २०१२ पर्यंत ना उद्योग ना नोकरी, अशी अवस्था येथील शेतकऱ्यांची झाली होती. खारभूमी विभागाने संरक्षण बंधारे न काढल्यामुळे येथील जमिनीमध्ये खारेपाणी घुसून जमिनी नापीक झाल्या होत्या. त्यामुळे शेतीदेखील करता येत नव्हती. उपजीविका नष्ट झाल्याने २०१३ मध्ये येथील शेतकऱ्यांनी श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर यांची भेट घेऊन लढ्याचे नेतृत्व करण्याची मागणी केली होती.

त्यानंतर श्रमिक मुक्ती दलाचे डॉ. भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली रस्त्यावरील आणि न्यायालयीन लढाईला सुरुवात झाली होती. यासाठी एकूण ११ आंदोलने झाली. तीनवीरा धरणाजवळ झालेल्या ठिय्या आंदोलनाची दखल सरकारने घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री येथे बैठक झाली. अलिबाग उपविभागीय अधिकारी यांनी अहवाल सादर करावा, असे निर्देश दिले.

दरम्यानच्या काळात कंपनीने मुदतवाढ घेतली. अशा तीन मुदत वाढी कंपनीने घेतल्या; परंतु नंतर पुन्हा उद्योग आयुक्तांनी मुदतवाढ दिली नाही. कंपनी महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमीन कायदे सुधारणा अधिनियमच्या तरतुदीनुसार एकूण पंधरा वर्षांचा कालावधी संपुष्टात आला असल्याने सदर जमिनी मूळ मालकाने ज्या किमतीला विकत घेतली होती. तितक्याच किमतीला खरेदी करण्याचा हक्क प्राप्त झाला.

तत्कालीन अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी महाराष्ट्र पूर्व वहिवाट व शेतजमीन अधिनियमामधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकारांमुळे पटणी एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने खरेदी केलेल्या जमिनी मूळ खरेदी किमतीला मूळ शेतकरी किंवा त्यांचे कायदेशीर वारस यांना पुनश्च खरेदी देण्यासंदर्भात आदेश पारीत केले होते. दीड वर्ष याची माहिती मिळाली नाही. श्रमिक मुक्ती दलाचे संघटक राजन भगत यांचा अपघात झाल्याने रायगड युनिटचे काम बंद होते. त्यामुळे प्रशासनाबरोबर संपर्क नव्हता. त्यानंतर श्रमिक मुक्ती दलाचे राजेंद्र वाघ यांना याची प्रत मिळाल्यावर ही माहिती समोर आली आहे.

दरम्यान, मेढेखारमधील ५४० शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसून नुकसान झाले आहे. नुकसानभरपाईची तरतूद नसल्याने ते शेतकरी नुकसानभरपाई मिळण्यासाठी अद्यापही संघर्ष करत आहेत. प्रशासन आणि सरकारने याचीदेखील दखल घेणे गरजेचे आहे.

## ‘मविआ’कडून सरकारविरोधात ‘जोडे मारो’

आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शरद पवार, उद्धव ठाकरे, कोल्हापूरचे खासदार शाहू छत्रपती, नाना पटोले यांच्यासह नेतेमंडळी सहभागी झाले आहेत. मालवणमध्ये नौदल दिनानिमित्त उभारलेला छत्रपती शिवरायांचा पुतळा २६ ऑगस्ट रोजी कोसळला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने महायुती सरकारविरोधात ‘जोडे मारो’ आंदोलनाची हाक दिली होती. मंगळवारी हुतात्मा स्मारकाला अभिवादन करून तिथून सर्वजण गेटवे ऑफ इंडिया येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर मविआकडून सरकारविरोधात ‘जोडे मारा’ आंदोलन केले.

## दांडगुरीत बिबट्याची दहशत

होती, तसेच तालुक्यातही वारंवार बिबट्याचा संचार घडत असतो. पुन्हा एकदा दोन बिबटे दिसल्याने नागरिकांमध्ये घबराट उडाली आहे. श्रीवर्धन-दांडगुरी बोर्लीपंचतन रोडला दिवसभरत खूप वर्दळ दिसून येत असते. तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे बहुतांश लोक दुचाकीने प्रवास करीत असतात. बिबट्याच्या दिसण्याने दुचाकीस्वारांमध्ये तसेच दांडगुरी पंचक्रोशितील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. असाच बिबट्याचा संचार वाढत राहिला तर पाळीव प्राणी तसेच नागरिक यांच्याही जीवाला धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वेळीच संबंधित विभागाने लक्ष दिलं पाहिजे, अशी पंचक्रोशितील रहिवाशांकडून मागणी केली जात आहे.

## प्रदूषणाबाबत चिंता व्यक्त

जाहीर करणे अपेक्षित असते. पनवेल पालिकेनेही ३१ जुलै रोजी प्रदूषणाचा अहवाल जाहीर केला आहे. अहवालात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या देखरेखीसाठी नागरी संस्थांनी आग्रह धरावा, अशी शिफारस करण्यात आली आहे. तसेच नाल्यात सोडण्यापूर्वी सांडपाणी विल्हेवाट लावण्यासाठी सुयोग्य तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास सांगितले गेले आहे. दाट लोकवस्तीच्या भागात ३ रिअल टाइम एअर क्वालिटी मॉनिटरिंग सिस्टीम स्थापित कराव्यात, लोकांना सार्वजनिक वाहतूक वापरण्यास प्रोत्साहित कराव्यात, अशा सूचना अहवालात करण्यात आल्या असून, बायोफिजिकल पर्यावरण, बदलांचे ट्रेंड, बदलत्या ट्रेंडचे परिणाम, पायाभूत संरचना गुणवत्ता, लोकसहभाग, कृती योजना विकसित करणे आणि पर्यावरणास अनुकूल शाश्वत शहरासाठी मार्ग तयार करण्यासाठी ईएसआर तयार करण्यात आला आहे. नागरी संस्थेच्या ९ टक्क्यांपेक्षा कमी क्षेत्र हिरव्या अच्छादनाखाली आहे. जैवविविधतेच्या सविस्तर सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे की, वृक्षाच्छादनात घट झाली आहे आणि बांधकाम कामांमुळे झाडे तोडली जात आहेत, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच औद्योगिक वसाहतीमधून सोडण्यात येणारे रासायनिक सांडपाणी नदी नाल्यामध्ये सोडण्यास नियंत्रण मिळवण्यासाठी कठोर नियम करणे सुचवण्यात आले आहे. तळोजा औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यातील रसायनिक सांडपाणी नदी नाल्यात सोडण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्याने नद्या, तलाव आणि तलावांसह सर्व जलस्रोतांची नियमितपणे योग्य उपकरणे वापरून साफसफाई करणे आवश्यक आहे. पालिकेचा प्रदूषणाचा सद्यःस्थितीचा अहवाल वेळेत प्रसिद्ध करण्यात आला आहे. पालिकेच्या संकेत स्थळावर तो सर्वांसाठी उपलब्ध आहे, अशी माहिती पालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिली.

## करंजा बंदर फिशिंग हार्बर करणार : फडणवीस

केंद्र, उरण टाऊन हॉल यांचे लोकार्पण आणि उपजिल्हा रुग्णालय भूमीपूजन, उरण चारफाटा येथील मच्छी मार्केटचे उद्घाटन यांसह विविध विकासकामांचा शुभारंभ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उरण येथे झाला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उद्योगमंत्री तथाजिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, न्हावा-शिवडी अटल सेतूमुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळाली आहे. भविष्यात उद्योगाचे खरे मॅग्नेट रायगड जिल्हा होणार आहे. यामुळे जिल्ह्यात मोठ्या संधी निर्माण होणार आहेत. नवी मुंबई विमानतळामुळे जीडीपीमध्ये १ टक्के वाढ होणार आहे. डेटाचे हब म्हणून रायगड आणि नवी मुंबईची ओळख निर्माण झाली आहे. या दोन भागांमधून मोठ्या प्रमाणात डेटाची निर्मिती होत असून, देशपातळीवर डेटा सेंटर्सची ६० टक्के क्षमता ही रायगड आणि नवी मुंबईत आहे. त्यामुळे या पुढील काळात महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन म्हणून रायगड जिल्हा होत असल्याचेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी म्हटले आहे.

## गणेशभक्तांसाठी ३४२ स्पेशल ट्रेन

मात्र, गौरी-गणपतींच्या काळात रस्त्यावरदेखील मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी असते. त्यामुळं कोकणात पोहोचण्यासाठीच १२ ते १४ तास लागतात. अशावेळी रेल्वेचा प्रवास खूप आरामदायी व सोयीचा वाटतो. मात्र, बुकिंग फुल्ल असताना नागरिकांचा हिरमोड होतो. त्यासाठीच रेल्वे प्रशासनाने कोकणात जाण्यासाठी जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. कोकणात जाण्यासाठी प्रवाशांनी ३०० गणपती स्पेशल ट्रेनची मागणी केली होती. मात्र, भारतीय रेल्वेने भक्तांची सुविधा पाहता ३४२ ट्रेन चालवण्याचा निर्णय घेतला आहे.

# महामार्गावरील खड्डे भरण्याचे काम सुरू

। पेण । प्रतिनिधी ।

मागील अनेक वर्षांपासून मुंबई-गोवा महामार्गाचे काम कासव गतीने सुरु असून, दरवर्षी गणेशोत्सव काळात चाकरमान्यांना खड्ड्यांमधून प्रवास करावा लागत असतो. याविरोधात वाहनचालकांसह चाकरमान्यांनी आवाज उठवला होता. त्यानंतर सत्ताधाऱ्यांना जाग आली. आधी खासदारांनी महामार्गाचा पाहणी दौरा केला, त्यानंतर मंत्र्यांनी पाहणी केली. शेवटी जनतेतून टीकेची झोड उठत असल्याने मुख्यमंत्र्यांनी महामार्गाची पाहणी केली. त्यानंतर आता कुठे महामार्गावरील खड्डे दुरुस्तीचे काम सुरू आहे.




गणेशोत्सवाला अवघे पाच दिवस बाकी आहेत. त्याआधी रस्ता दुरुस्तीचे काम होणे गरजेचे आहे. तसे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. दरम्यान, पनवेल ते इंदापूर या ८४ किलोमीटरच्या कामातील गोवाकडे जाताना पेणपासुन पुढे या महामार्गाची अत्यंत दुरवस्था झालेली असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाहणी केल्यानंतर या महामार्गाची दुरवस्था पाहता एका ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर आता या महामार्गावर काम करणाऱ्या ठेकेदारांनी योग्य ते काम करण्याला प्राधान्य दिले असून, आता महामार्गावरील खड्डे पक्क्या स्वरूपात भरले जात आहेत. परंतु, गणेशोत्सवापूर्वी हे खड्डे भरून पूर्ण होतील का, याबाबत साशंकता आहे. पेण तालुक्यातील कासूपासून अगदी इंदापूरपर्यंत प्रवास करताना प्रवाशांच्या नाकी नऊ यायचे. मात्र, आता हे खड्डे भरले जात असल्याने प्रवासी समाधान व्यक्त करत आहेत.

> कामाच्या बाबतीत विचार केला असता पेण बसस्थानकाचे काम गेली अनेक वर्षे रखडलेले होते. मात्र, रामेश्वर कन्स्ट्रक्शनने अवघ्या आठवडाभरात हे काम एवढ्या चांगल्या प्रतीचे केले आहे की या मुंबई-गोवा महामार्गाचे कामदेखील त्यांनाच दिले तर वर्ष ते दीड वर्षात हे काम ते चांगल्या पद्धतीने पूर्ण करून प्रवाशांना सुखकर प्रवास करता येईल.
> – निलेश कोळी, दैनंदिन प्रवासी

# माऊली नर्सिंग होममध्ये कॅन्सरची मोफत तपासणी

। पेण । प्रतिनिधी ।

पेण येथील डॉ. सोनाली शेट्ये यांच्या माऊली नर्सिंग होममध्ये दर शनिवारी दुपारी २ ते ४ गर्भाशयाच्या पिशवीच्या तोंडाच्या कॅन्सरची तपासणी मोफत केली जाते. त्या मोफत तपासणीचा फायदा जास्तीत जास्त महिलांनी घ्यावा, असे आवाहन स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सोनाली शेट्ये यांनी कृषीवलशी बोलताना केले.

त्या पुढे म्हणाल्या की, आज मोठ्या प्रमाणात गर्भाशय पिशवीच्या तोंडाचा कॅन्सर महिलांमध्ये उद्भवत आहे. वेळेत तपासणी होऊन निदान झाल्यास कित्येक माता-भगिनींचा जीव वाचू शकतो. आजच्या घडीला ग्रामीण भागामध्ये गर्भाशयाच्या पिशवीच्या तोंडाच्या कॅन्सरबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीनेदेखील आम्ही पावले उचलत आहोत. आज ही तपासणी महागडी असल्याने कित्येक महिला तपासणी करत नाहीत. ही बाब लक्षात घेऊनच आम्ही माऊली नर्सिंग होममध्ये मोफत तपासणी दर शनिवारी ठेवली आहे. तरी या मोफत तपासणीचा लाभ घेऊन महिलांनी आपले आरोग्य जपावे, असे आवाहन डॉ. शेट्ये यांनी केले आहे.

# उपप्राचार्य एल.ए. पाटील सेवानिवृत्त

। पेण । प्रतिनिधी ।



महाराष्ट्र शिक्षण संस्था पेण संचलित सार्वजनिक विद्या मंदिर व ज्युनि. कॉलेजचे उपमुख्याध्यापक तथा उपप्राचार्य एल.ए. पाटील हे आपल्या नियत वयोमानुसार दि. ३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त झाले. गोरगरिबांच्या मुलांचे कौवारी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या के. आर. पाटील यांच्या शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून ते रुजू झाले. वाणीवर सरस्वती प्रसन्न असल्याने एल.ए. पाटील हे विद्यार्थ्यांच्या गळ्यातील ताईत बनले. आणि इंग्रजी, भूगोल या विषयाचे विद्यार्थ्यांचे आवडीचे शिक्षक झाले. शिक्षकपदापासून मुख्याध्यापक पदापर्यंत त्यांची पदोन्नती झाली.

सेवापूर्ती समारंभासाठी महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. पी.डी. पाटील, उपाध्यक्ष व संस्थेचे सर्व संचालक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, एल.ए. पाटील यांचे कुटुंबिय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिष्ठीत मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्ष पी.डी. पाटील यांनी संस्थेतर्फे एल.ए. पाटील यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित केले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात एल.ए. पाटील संस्थेच्या व शाळेच्या प्रगतीत योगदान स्पष्ट करुन त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करुन भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

। पाताळगंगा । वार्ताहर ।

शालेय शिक्षण घेत असताना विद्यार्थी शैक्षणिक साहित्यापासून वंचित राहू नये, तसेच पालकांचा मुलांवरील शिक्षणांचा खर्च कमी व्हावा, या उदात्त विचारातून रायगड जिल्हा परिषद शाळा कारगाव येथील विद्यार्थ्यांना दप्तर तसेच शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. त्याचबरोबर तुकसई येथील ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी मोफत औषधे देण्यात आली. हे दोन्ही उपक्रम एटीजी सामजिक संस्था, बिलियन हार्ट बिट्टींग, अपोलो हॉस्पिटल यांच्या सहकार्याने डॉ. विश्वासराव गिरी, अश्विनी गिरी यांच्या माध्यमातून पार पडले.




गेली अनेक वर्षे विविध उपक्रम राबवित असताना सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम ही संस्था करीत आहे. दरम्यान, आरोग्य तपासणीला यावेळी ग्रामस्थांचा उदंड प्रतिसाद पाहावयास मिळाला.

विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांना केलेल्या सहकार्यामुळे या सामजिक संस्थेचा ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले. आपण प्रत्येक वेळी सहकार्य करण्यास तयार असल्याचे डॉ. गिरी यांनी सांगितले. यावेळी अपोलोचे सहकारी, परेश सर, राजिप शाळा कारगाव मुख्याध्यापक राजेंद्र दुर्गे, तुकसई ग्रामस्थ म्हणून सुनील सर, रोहित पाटील उपस्थित होते.

# कीडरोगाबाबत गावबैठकीतून जनजागृती

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

अतिपावसानंतर अचानक हवामानातील बदलामुळे भातपिकावर रोग व कीड प्रादुर्भाव, अन्नद्रव्यांची कमतरता दिसत असून, कुडपण खुर्द येथे काही प्रमाणात निळे भुंगेरे कीड व सूक्ष्म अन्नद्रव्ये कमतरता आढळून आल्या होत्या. त्याअनुषंगाने उपविभागीय कृषी अधिकारी जितेंद्र रणवरे यांचे उपस्थितीत तालुका कृषी अधिकारी सूरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली क्रॉपसॅप अंतर्गत रोग व कीड व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन कुडपण खुर्द येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय कृषी अधिकारी जितेंद्र रणवरे, तालुका कृषी अधिकारी सूरज पाटील, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, कृषी सहायक मनोज जाधव, संग्राम साळुंखे, माजी सरपंच हनुमंत शेलार, मंगेश चिकणे, प्रमुख मार्गदर्शक कृषी प्रगतशील शेतकरी ज्ञानोबा शेलार, ग्रामपंचायत सदस्य महादेव शेलार, शिवाजी शेलार आदी उपस्थित होते. पोलादपूर तालुक्यात भात पिकावर निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव मागील तीन-चार वर्षांपासून दिसून येत आहे. प्रतिबंधक उपाययोजनेमध्ये ही निळे भुंगेरे कीड भातपिकानंतर बांधावरील गवतावर आणि भाताच्या फुटव्यांवर उपजीविका करते आणि पुढील हंगामात भात पिकास उपद्रव करते. त्यासाठी भातलागवडीनंतर बांध स्वच्छ ठेवावेत. शेतात पाणी जास्त काळ न साठता निचरा होईल याची काळजी घ्यावी, असे मत उपविभागीय कृषी अधिकारी जितेंद्र रणवरे यांनी व्यक्त केले.

# शाश्वत शेतीसाठी सेंद्रिय शेती काळाची गरज

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

स्वत:च्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी तरी सेंद्रिय मालाचे उत्पादन घेतले पाहिजे तरच आपले आरोग्य उत्तम राहील, असे प्रतिपादन आत्मा रायगड प्रकल्प संचालक शिवाजी भांडवलकर यांनी पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी येथे केले. शाश्वत शेतीसाठी सेंद्रिय शेती काळाची गरज बनली असल्याचा दावाही भांडवलकर यांनी यावेळी केला.

गोळेगणी येथील जननी रामेश्वर शेतकरी गट पाहणी व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

### शिवाजी भांडवलकर यांचे मत

त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रायगड आत्मा संचालक शिवाजी भांडवलकर, तालुका कृषी अधिकारी सूरज पाटील, शेतकरी गट अध्यक्ष प्रकाश मोरे, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, कृषी सहाय्यक मनोज जाधव, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक कपिल पाटील, कृषी मित्र नामदेव येरुणकर, ग्रामरोजगार सेवक शेखर येरुणकर, अनिकेत मोरे, प्रगतशील शेतकरी राजेंद्र दळवी, दिपक सुर्वे आदी शेतकरी उपस्थित होते.



रायगड आत्मा प्रमुख प्रकल्प संचालक शिवाजी भांडवलकर यांनी पोलादपूर तालुक्यातील देवपूरवाडी येथील डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत गटातील प्रगतशील शेतकरी संजय नाना पवार व ज्ञानेश्वर धोंडू पवार यांची सेंद्रिय हळद लागवड, नाचणी, भात प्रात्यक्षिकाची पाहणी व मार्गदर्शन केले. परंपरागत कृषी विकास योजना सेंद्रिय शेती अंतर्गत स्थापित जननी रामेश्वर शेतकरी गट गोळेगणी पाहणी करून जीवामृत बिजामृत, दशपर्णी अर्क करता ड्रमचे वाटप केले. नामदेव दगडू येरुणकर यांनी तयार केलेल्या जलकुंड पाहणी करून त्यावर आधारित फळबाग लागवड व परस बागेतील भाजीपाला लागवड पाहणी केली.

**निवडक**

### ज्येष्ठांसाठी एक हात मदतीचा

**पनवेल** : ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल शहर या संस्थेने सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत डायलिसिस रुग्णांच्या मदतीसाठी रुपये ५० हजार रक्कमेचा धनादेश पटवर्धन हॉस्पीटल पनवेलला सुपूर्द केला. यावेळी पटवर्धन हॉस्पिटल येथे प्रत्यक्ष जाऊन ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष जयवंत गुर्जर यांच्या हस्ते हॉस्पिटलचे सचिव समेळ व कार्यवाह लघाटे यांना सुपूर्द करण्यात आला. यावेळी उपाध्यक्षा माधुरी गोसावी, सचिव सुनिल खेडेकर, सह.सचिव भास्कर चव्हाण तसेच इतर संचालक उपस्थित होते.

### १५ टक्के लाभांश जाहीर

**मुरुड जंजिरा** : मुरुड मर्चंट पतसंस्थेने सलग १५ टक्के लाभांशाची परंपरा कायम ठेवल्याने व्यापारी सदस्यांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे. यावेळी व्यासपीठावर प्रा. एस. बी. वटाणे, अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष ललित जैन, संचालक नितीन आंबुर्ले, अशोक धुमाळ, विपुल मेहता, महेंद्र कुमार पारेख, डॉ. राजकुमार कल्याणी, विजय गिदी, नौशाद दळवी, श्रीकांत खोत, वासंती उमरोटकर, नगमा खानजादा, सचिव मोरेश्वर मसाल आदी मान्यवर उपस्थित होते.

### पालक संघाची सभा संपन्न

**श्रीवर्धन** : कापडे येथील श्री वरदायिनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात नुकतीच पालक संघाची सभा संपन्न झाली. शाळा समितीचे सभापती रामदास सिताराम सकपाळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत विद्यार्थ्यांच्या हिताचे काही महत्वाचे निर्णय घेण्यात आल्याचे शाळा समितीचे सदस्य अजय सलागरे यांनी सांगितले. यावेळी शैलेश सलागरे, राजू बावळेकर, सतिश गोरे, शिवराज जोगिलकर, सुरेश जाधव, विठोबा गायकवाड, मुख्याध्यापक लवटे आदी उपस्थित होते.

### संत सेना महाराज पुण्यतिथी

**म्हसळा** : श्री संत सेना महाराज यांची ६६९ वी पुण्यतिथी म्हसळा तालुका नाभिक समाजाचे अध्यक्ष सुशील यादव यांच्या निवासस्थानी साजरी करण्यात आली. या कार्क्रमास विलास यादव,महादेव कदम, दिलीप शिर्के, नथुराम पवार, राजेंद्र बडे, प्रदीप कदम, दिपल शिर्के, रुपेश पवार, प्रशांत चव्हाण, संदीप जाधव, सुनील भोसले, सदानंद साळुंखे, अनंत शिंदे, दादा पानसरे ,समीर बनकर, सुनील उमरोठकर , भाई बोरकर, कविता बोरकर, नंदकुमार गोविलकर, योगेश करडे आदी समाजबांधव उपस्थित होते.

### आरोग्य शिबीर उत्साहात

**उरण** : ओएनजीसी तर्फे नागाव ग्रामपंचायतीमध्ये वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डी के त्रिवेदी यांनी वैद्यकीय शिबिराचे उद्घाटन केले.वैद्यकीय शिबिरात मोफत नेत्र तपासणी व चष्म्याचे वाटप, श्वसनाच्या आजारांची तपासणी, क्षय रोग, एचआयव्ही तपासणी, औषध आणि पोषण किट वाटपाचा समावेश होता. तज्ञ डॉक्टरांनी सल्ला मसलत करण्यासाठी शिबिराला भेट दिली. यामध्ये नेत्ररोग तज्ञ, फुफ्फुस तज्ज्ञ आणि फिजिशियन यांचा समावेश होता.

# महाजने ग्रामस्थांचा स्तुत्य उपक्रम

## लोकसहभागातून स्वच्छता, विसर्जन घाट बांधणी



। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील महाजने ग्रामस्थांनी लोकसहभागातून अलिबाग-बेलोशी मार्गावर पडलेले खड्डे बुजविणे, रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले गवत झुडपं काढणे, परिसराची स्वच्छता करणे तसेच गणेशमुर्ती विसर्जन घाट तयार करण्याचे काम केले आहे. या स्तुत्य उपक्रमात ग्रामस्थ, महिला व तरुण मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी नोकरी निमित्त मुंबईत राहणाऱ्या मंडळींनीदेखील योगदान दिल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे. यावेळी हातात फावडे, टिकाव, कोयते, घमेल घेऊन सर्व ग्रामस्थ, महिला एकत्र आले होते.

तालुक्यातील महाजने येथील ग्रामस्थ व महिला मंडळ एकत्र येऊन कायमच लोकसहभागातून समाजोपयोगी काम करीत आले आहेत. येत्या ७ सप्टेंबरला गणरायाचे आगमन होणार असून अवघे सहा दिवसच शिल्लक राहिले आहेत. महाजने-बेलोशी रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांची दुरुस्ती करण्यास जिल्हा परिषद बांधकाम विभाग अपयशी ठरल्याने ग्रामस्थांनी पुढाकार घेत शनिवारी (दि.३१) सकाळी लोकसहभागातून रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली. रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले गवत, झुडूप देखील काढून परिसर स्वच्छ करण्यात आला.

तसेच, महाजने गावानजीक असलेल्या नदीमध्ये दरवर्षी गणेशमूर्तींचे विसर्जन केले जाते. ग्रामस्थांनी शासनाच्या एक पाऊल पुढे टाकत लोकसहभागातून विसर्जन घाट तयार करण्याचे काम सुरु केले. गावांतील पुरुष, महिला, तरुण मंडळी सर्वांनी मदतीचा हात देत विसर्जन घाटाचे काम करण्यात आले. यामध्ये मुंबईत नोकरीला असलेल्या मंडळींकडून उपयोगी वस्तू, सिमेंट, रेती, खडी आदी साहित्यांच्या रुपात मदत करण्यात आली. गावातील या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

> **महेश ठाकूर, विनायक भोनकर, अरविंद पाटील, प्रकाश पारंगे, राकेश औचटकर, पंच ग्रामस्थ मंडळ यांच्या संकल्पनेतून, मुंबई रहिवासी मंडळ महाजने, ग्रामस्थ मंडळ महाजने यांच्या संयुक्त विद्यमाने महिला मंडळाच्या विशेष सहाय्यातून गणपती विसर्जन रस्ता हा उपक्रम लोक वर्गणीतून राबविला आहे. संपूर्ण गावकीने श्रमदानातून काम केले असून स्वच्छता तसेच रस्त्यावरील खड्डेदेखील बुजविले.**
> **– ग्रामस्थ मंडळ महाजने**

## कर्जतमधील प्रदर्शनात ६५ बचत गटांचा सहभाग

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात बचत गटांच्या चळवळीला आणखी बळ देण्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या माध्यमातून गणेशोत्सव निमित्ताने प्रदर्शन मांडण्यात आले आहे. कर्जत तालुक्यातील ६५ बचत गटांनी आपण बनवलेल्या वस्तूंचे प्रदर्शन मांडले होते.

कर्जत तालुक्यातील महिला स्वयंसहायता महिला बचत गट यांनी बनवलेल्या वस्तूंच्या विक्रीचे प्रदर्शन नेरळ येथे भरवण्यात आले आहे. नेरळ येथील बापूराव धारप सभागृहात हे वस्तू प्रदर्शन भरवण्यात आले होते. प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी या अभियानाचे कर्जत तालुका व्यवस्थापक राजू नेमाडे, उमेद संस्थेच्या तालुका अध्यक्ष रेखा हिरेमठ, सचिव दिशा भोईर, खजिनदार योगिता कोळंबे, तसेच अन्य पदाधिकारी यांच्यासह या अभियानाचे विभाग समन्वयक अविनाश जाधव, रामराव हानुमंते, रेश्मा लांडगे, स्वाती वाघ आणि मनोहर जाधव, समूह साधन व्यक्ती शोभा शेंडे, तन्वी भवारे आदी उपस्थित होते. यावेळी प्रामुख्याने सहभागी असलेले महिला बचत गट तालुक्याच्या वेगवेगळ्या भागातून आले होते. यामुळे महिलांना वस्तू उपलब्ध होऊ शकल्या अशी माहिती रेखा हिरेमठ यांनी दिली.

**जाहिरात**

**श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन**
**आयुर्वेदिक रुग्णालय व मेडिकल कॉलेज**
वेलशेत-नागोठणे, ता. रोहा-रायगड

**येथे खालील पदांसाठी त्वरीत भरती प्रक्रिया चालू आहे. तरी इच्छूक उमेदवारांनी दि. २-०९-२०२४ ते दि. ६-०९-२०२४ या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत सर्व कागदपत्रांसह कार्यालयात प्रत्यक्ष येऊन संपर्क साधावा. संपर्कासाठी फो.नं. ८०८७५६०३३९**

**जागा**
१. सिक्युरिटी गार्ड- १० वी किंवा १२ वी पास, (४ जागा)
२. सिक्युरिटी सुपरवाईजर- १२ वी पास व अनुभव, (१ जागा)
३. हाऊस किपींग स्टाफ - (४ जागा)
४. हाऊस किपींग सुपरवाईझर- १० वी किंवा १२ पास व अनुभव, (१ जागा)
५. कुक- अनुभव आवश्यक, (१ जागा)
६. हॉस्टेल वॉर्डन- अनुभव आवश्यक, (१ जागा)
७. क्लार्क - (४ जागा)
८. अकाऊंटंट - (२ जागा)

बायोडेटा ९४२२८५५९०६ ह्या नंबरवर व्हॉट्सअॅप पाठवणे.

भारतीय एज्युकेशन विद्यासंकुल नागोठणे

## दोन दलालांच्या हत्येप्रकरणी
# पाच जणांना अटक

**तांत्रिक तपासाद्वारे संशयित ताब्यात**

**या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे विठ्ठल या संशयितास ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीतून हत्येचा उलगडा झाला. त्यानंतर अन्य आरोपींना अटक करण्यात आली. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे कर्नाळा अभयारण्य परिसरात फेकलेला अन्वर याचा मृतदेह ताब्यात घेण्यात आला.**

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी मृतावस्थेत आढळलेल्या दोन दलालांच्या हत्येचा उलगडा झाला असून पोलिसांनी याप्रकरणी पाच जणांना अटक केली आहे.

जमिनीच्या व्यवहारातून हा प्रकार घडल्याचे तपासात समोर आले असून यातील एक मृत दलाल सुमित जैन यानेच हा कट रचल्याचे समोर आले आहे. दुसऱ्या दलालाच्या हत्येनंतर सुपारीच्या पैशांवरून वाद झाल्याने जैन याचीही हत्या झाल्याचा पोलिसांचा संशय आहे.

विठ्ठल नाकाडे, जयसिंग ऊर्फ राजा मधु मुदलीयार, आनंद कुज, वीरेंद्र कदम, अंकुश सीतापुरे अशी या आरोपींची नावे असून त्यांना ३१ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सुमित जैन आणि आमिर अन्वर खानजादा अशी हत्या झालेल्या दलालांची नावे आहेत. हे दोघेही २१ ऑगस्ट रोजी नेरुळ येथून बेपत्ता झाले होते.

## बाप्पांच्या मूर्त्यांचे काम अंतिम टप्प्यात

। तळा । वार्ताहर ।

श्री गणेशाचे आगमन काही दिवसांवर येऊन ठेपला असल्याने रंगकाम करून झालेल्या मूर्तींना हिऱ्या, मोत्यांचा साज चढविण्यात कारागिरांची लगबग सुरू झाली आहे.

यंदा ७ सप्टेंबरला बाप्पाचं आगमन होत असल्याने गणेशोत्सवासाठी काही दिवसच शिल्लक राहिले आहेत. त्यामध्ये कारागिरांची कमतरता, वारंवार वीज पुरवठा खंडित होणे अशा समस्या कारखानदारांना सतावत असल्याने मूर्त्यांची ऑर्डर पूर्ण करण्याच काम दिवस रात्र सुरू आहे.



पूर्वी रंगकाम पूर्ण झाल्यावर मूर्ती विक्रीसाठी सज्ज असत मात्र गेल्या काही वर्षांपासून हिरे, मोती लावून देण्यासाठी मागणी वाढल्याने कारखानदार कारागिरांना ५०० ते ७०० रूपये मजुरी देऊन मूर्त्यांना हिरे, मोती, झिंग लावून आकर्षक बनविण्याचे काम पूर्ण करून घेत आहेत. हल्ली बाप्पांना विविध रुपात आणण्याच फॅड आलं आहे. श्री राम, जय मल्हार, विठ्ठल, शिवशंकर आदी रुपांमधील गणेश मूर्तींना मागणी वाढल्याने त्या रुपाला साजेशी कलाकृती करण्यास वेळ लागतो. त्यामुळे कारखानदारांकडून तीन महिन्यापासूनच कारखान्यात मूर्तीचं काम सुरू असून या सर्व मूर्तीचं काम अंतिम टप्प्यात आले आहे. गणेशोत्सवाला अगदी काही दिवसच शिल्लक राहिले असल्याने या मूर्त्यांचं काम पूर्ण करण्यासाठी कारागिरांची लगबग सुरू असल्याचे चित्र आहे.

### प्रभाकर वाडकर यांचे निधन

**श्रीवर्धन** : श्रीवर्धन येथील ज्येष्ठ कॉंग्रेस नेते प्रभाकर सखाराम वाडकर यांचे शनिवारी (दि.३१) पहाटेच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.मृत्युसमयी त्यांचे वय ७२ वर्षांचे होते. त्यांचे मागे दोन मुलगे, सुना, नातवंडे, दोन मुली, दोन भाऊ असा परिवार आहे. पै. बॅ. ए. आर. अंतुले यांचे अत्यंत निकटवर्ती आणि निष्ठावंत नेते कै.सखाराम सि.वाडकर यांचे कै. प्रभाकर हे सुपुत्र होत. कै. प्रभाकर वाडकर हेही पै.बॅ.अंतुले, कै. रविंद्र राऊत यांचे अत्यंत निष्ठावान व निकटवर्ती होते.

## जासई ग्रा.पं.ची अतिक्रमणाविरोधात मोहीम

**हनुमान मंदिर ते हिम्मत नगरी रस्त्यावरील अतिक्रमण हटविणार**

। चिरनेर । प्रतिनिधी ।

जासई ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यावर अतिक्रमण करून अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. यामध्ये जासई हनुमान मंदिर ते हिम्मत नगरीकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात येणार आहे.



३१ मे रोजी झालेल्या ग्रामसभेत या विषयावर वादळी चर्चा झाली. यावेळी सार्वजनिक रस्त्यावर केलेल्या संरक्षण भिंतीचे बांधकाम काढून, ते बांधकाम सार्वजनिक रस्त्यापासून दोन फूट आतमध्ये घेऊन नव्याने करण्यात यावे. त्यासाठी आमची कोणतीच हरकत नाही, अशी चर्चा झाली. जासई हनुमान मंदिर ते हिम्मत नगरीकडे जाणाऱ्या रस्त्यावर अतिक्रमण बांधकामाचा पंचनामा करण्यासाठी पंच कमिटी निवडण्यात आली आहे. यात रघुनाथ ठाकूर, यशवंत घरत, दत्तात्रेय घरत, शंकर घरत, वंदना पाटील यांची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार ग्रुप ग्रामपंचायत जासईने अतिक्रमण करणाऱ्यास व पंच कमिटी पत्र देऊन अतिक्रमण खात्री पंचनामा करण्यात आला. अतिक्रमण असल्याचे सिद्ध करण्यात आले आहे. यावेळी शासकीय अधिकारी उपस्थित होते.

**फोटो कॉपीप्रमाणे गणेशमूर्तीसाठी नेरळ प्रसिद्ध**

# शाडूच्या मूर्ती ठरताहेत आकर्षण

। नेरळ । प्रतिनिधी ।

प्रामुख्याने ठाणे जिल्ह्यातील गणेश भक्तात नेरळ येथील गणेश मूर्ती बनविणारा कारखाना प्रसिद्ध आहे.फोटो कॉपी प्रमाणे गणेश मूर्ती बनविला जाणारा कारखाना अशी ओळख असलेल्या कारखान्यात केवळ शाडूच्या मूर्ती बनविल्या जातात. रंगसंगतीसाठी प्रसिद्ध असलेल्या नेरळमधील कुंभारवाड्यातील गणेशमूर्ती या कायम आकर्षण राहिल्या आहेत.



नेरळमधील कुंभारआळी आणि तेथील कुंभारवाडा हा खास गणपती बाप्पा च्या मूर्ती बनविण्यासाठी प्रसिद्ध आहे. ७० वर्षे दहिवलीकर यांच्या कारखान्यात शाडूच्या मातीपासून बनविल्या जाणाऱ्या गणेशमूर्ती या घडविल्या जातात.कुंभार आडनावाचे दहिवलीकर झाले पण त्यांची या महागाईच्या जमान्यात शाडूच्या मातीपासून बनविल्या जाणाऱ्या मूर्ती यांची आवड काही कमी झाली नाही. कर्जत तालुक्यात शाडूच्या मातीचे म्हणजे पर्यावरण पूरक मातीपासून बनविले जाणाऱ्या गणेशमूर्ती यांचे निवडक कारखाने आहेत.त्यात नेरळ येथीळ दहिवलीकर यांचा पूर्वीचा श्री गणेश कलाकेंद्र आणि आताचे सिद्धेश गणेश कला केंद्र हा कारखाना आघाडीवर आहे.

दहिवलीकर यांची तिसरी पिढी शाडूच्या मातीपासून मूर्ती घडवत आहेत. त्यात महिला देखील आघाडीवर असून प्रामुख्याने रंगकाम करण्याचे काम महिला करीत असतात. महागाई असली तरी नेरळ मधील सिद्धेश कला केंद्रामध्ये गणेश भक्तांची एप्रिल महिन्यापासून ये जा सुरू होते. त्याचे कारण म्हणजे फोटो प्रमाणे गणेशमूर्ती बनवून दिल्या जात असल्याने नेरळ येथील गणेश मूर्ती ठाणे -मुंबईत प्रसिद्ध आहेत. शाडूच्या मूर्ती घडवून कमी नफा मिळत असला तरी दहिवलीकर कुटुंबे ही आनंदी आहेत.शाडूच्या मातीच्या मूर्ती या पेणच्या प्रसिद्ध गणेशमूर्तीच्या तोडीच्या असल्याने गुजरातवरून दरवर्षी अधिक किंमत मोजून माती आणून देखील ही कुटुंबे आनंदी आहेत.

> **आम्ही कायम चांगले देण्याचा प्रयत्न केला आहे,त्यामुळे कितीही किचकट फोटो जरी दिले तरी आम्ही आपले सर्वस्व त्यात ओतून मूर्ती घडवितो. त्यामुळे गणेशभक्तांना आमच्या कारखान्याबाबत विश्वास वाटतो,त्यामुळे चांगले देण्याचा प्रयत्न कायम राहिला आहे.**
> **– प्रमोद दहिवलीकर,मूर्तिकार**

> **आमच्या आजोबांनी सुरू केलेली परंपरा आम्ही काय नफा मिळतो हे न पाहता कायम ठेवली आहे.सध्याच्या धकाधकीच्या जीवनात आणि महागाई प्रचंड वाढली असताना देखील आम्ही ७० वर्षांपूर्वी ज्याप्रमाणे मूर्ती घडवायचो,अगदी त्याच प्रेमाने मूर्ती घडवित आहोत.त्यात आम्हाला येणाऱ्या प्रत्येकीला वस्तूंवर जीएसटी द्यावी लागत आहे. त्यामुळे आर्थिक गणिते जुळविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. मात्र ग्राहकांचा समाधान हेच आमचे भांडवल आम्ही समजत असून आहोत.**
> **– मिलिंद दहिवलीकर,मूर्तिकार**



# उत्तरेतील निवडणुका

येत्या महिन्यात होणाऱ्या हरियाणा आणि काश्मीरच्या निवडणुका अत्यंत महत्वाच्या ठरणार आहेत. यंदा लोकसभेला भाजपला उत्तर प्रदेशात जोरदार फटका बसला. ऐंशीपैकी सत्तर जागा जिंकणार असे म्हणता म्हणता एकदम आकडा ३४वर आला. समाजवादी पक्षाला भाजपपेक्षा अधिक जागा मिळाल्या. हरियाणात २०१९ मध्ये दहापैकी दहा जागा भाजपने जिंकल्या होत्या. यंदा त्याला केवळ पाच जिंकता आल्या. हरियाणात अगदी ऐन निवडणुकीच्या तोंडावर मनोहरलाल खट्टर यांना मुख्यमंत्रिपदावरून काढण्यात आले. खट्टर हे मोदींच्या जवळचे. त्यामुळे नंतर त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात घेण्यात आले. तरीही भाजपला यश मिळाले नाही. महाराष्ट्रात मराठे किंवा राजस्थानात राजपूत या जशा प्रबळ जाती आहेत तसे हरियाणामध्ये जाटांचे वर्चस्व आहे. त्यांची संख्या सुमारे २२ ते २७ टक्के आहे. शेती, उद्योग आणि व्यापारात तेच पुढे आहेत. त्यामुळे हरियाणा स्थापन झाल्यापासूनच्या ५८ वर्षांमध्ये ३३ मुख्यमंत्री जाट समाजाचे झाले. अशा प्रबळ जातींना शह द्यायचा ही भाजपची रणनीती. त्यानुसार पूर्वी महाराष्ट्रात आणि आता राजस्थानात ब्राह्मण मुख्यमंत्री करण्यात आला. हरियाणातील खट्टर हे पंजाबी. त्यांनी दलित व आदिवासी जातींना एकत्र करून जाटांविरुध्द आघाडी उभारण्याचा प्रयत्न केला. यामुळे भाजपवर जाट समाज प्रचंड नाराज आहे. दिल्लीतील शेतकरी आंदोलनातही जाटांचा पुढाकार होता. ते मोडून काढण्याचा प्रयत्न झाला. महिला कुस्तीपटूंनी लैंगिक शोषणाविरुध्द दिल्लीत आंदोलन केले होते. त्या या जाट प्रदेशातीलच होत्या. त्यांचे आंदोलन उत्तर प्रदेशातील ब्रिजभूषणशरण सिंग या भाजपच्या खासदाराविरुध्द होते. तो ठाकूर आहे. त्यामुळे त्याला हात लावण्यात आला नाही. त्याच्याऐवजी त्याच्या मुलाला लोकसभेचे तिकिट देण्यात आले. त्यामुळे यंदा जाट भाजपच्या विरोधात एकगठ्ठा मतदान करतील अशी शक्यता आहे. गेल्यावेळी जाटांचे नेते दुष्यंत चौटाला यांच्या जननायक पक्षाच्या पाठिंब्यामुळे भाजप सरकार तगले होते. आता चौटाला वेगळे झाले आहेत.

## काँग्रेसचे पारडे जड

भाजप विरोधातील मतदान यंदा लोकसभेला काँग्रेसकडे वळले. त्याला एकदम पाच जागा मिळाल्या. विधानसभेतील हीच स्थिती कायम राहील अशी अपेक्षा आहे. राज्य विधानसभेत ९० जागा आहेत. पण एकाच पक्षाला प्रचंड जागा मिळण्याचे प्रकार अलिकडे कमी झाले आहेत. लोकमताचा कौल विखंडित राहिला आहे. यंदा मात्र ते चित्र बदलेल व काँग्रेसला मोठा पाठिंबा मिळेल असे वातावरण आहे. परिणामी, काँग्रेसकडे तिकिटांसाठी एकच गर्दी उसळली आहे. ती रोखण्यासाठी काँग्रेसने चक्क उमेदवारी अर्जांची विक्री सुरू केली आहे. वीस हजार रुपयांना एक अर्ज. मागासवर्गीयांना सवलत आहे. आतापर्यंत अडीच हजारांहून अधिक अर्ज विकले गेले असून त्यातून काँग्रेसला साडेतीन कोटी रुपये मिळाले आहेत. पण काँग्रेसमध्ये माजी मुख्यमंत्री भूपिंदरसिंग हूडा आणि माजी केंद्रीय मंत्री शैलजा यांच्या दोन गटात कमालीचे वैमनस्य आहे. त्यावर दिल्लीतील नेत्यांना तोड काढावी लागणार आहे. आम आदमी पक्षाने शेजारच्या पंजाबात सत्ता मिळवली आहे. केजरीवाल हे मूळचे हरियाणाचेच आहेत. त्यामुळे त्यांच्या पक्षातले लोक फार अपेक्षा बाळगून होते. काँग्रेसशी युती न करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. खरे तर लोकसभेला पंजाब व दिल्लीत आम आदमी पक्षाचा दारुण पराभव झाला. त्यापासून धडा घेऊन त्यांनी काँग्रेससोबत जायला हवे होते. सध्या केजरीवाल तुरुंगात असल्याने पक्ष कमकुवत झाला आहे. कदाचित हरियाणा निवडणुकीच्या तोंडावर त्यांना सोडण्यात येईल. आम आदमीचे स्वतंत्रपणे लढणे हे काँग्रेसला फटका देणारे व भाजपच्या फायद्याचे ठरणार आहे. उत्तर प्रदेशातील मागासवर्गीयांचे नेते व अलिकडेच खासदार झालेले चंद्रशेखर आझाद यांचा पक्षही स्वतंत्रपणे लढणार आहे. दलितांच्या मतदारसंघात त्याचा चांगलाच फटका बसू शकतो. तरीही राजकीय जाणकारांच्या मते सध्याच्या घडीला काँग्रेसचे पारडे जड आहे. तसे झाले तर मोदींच्या मग्रूर राजवटीला आणखी एक दणका बसेल. निवडणुका हमखास जिंकून देणारा नेता ही मोदींची प्रतिमा खलास होईल.

## काश्मिरात काय होणार?

सीमेवरील जम्मू-काश्मीर राज्यात सर्वच पक्षांची कसोटी आहे. भाजपने राज्यातील उमेदवारांच्या याद्या जाहीर करून प्रचारात आघाडी घेण्याचा प्रयत्न केला. पण तो त्यांच्यावरच उलटला. कारण, भाजपच्या यादीत काँग्रेस व इतर पक्षांमधून आयात केलेल्या उमेदवारांचा भरणा आहे. त्यामुळे जम्मूतील भाजपचे कार्यकर्ते संतप्त झाले व त्यांनी पक्षाच्या मुख्यालयात निदर्शने केली. यामुळे भाजपला पहिली यादी मागे घ्यावी लागली. दुसऱ्या व तिसऱ्या यादीतही हेच होत आहे. मोदी सरकारने काश्मीरमधील ३७० वे कलम २०१९ मध्ये हटवले. त्यानंतर काश्मीर व जम्मू असे दोन केंद्रशासित प्रदेश करण्यात आले. या निर्णयांविरोधात जनतेत संताप आहे. मात्र राज्यात प्रचंड संख्येने लष्करी दले तैनात असल्यामुळे हे असंषोष प्रकट झालेला नाही. तो व्यक्त करण्याची पहिली संधी या विधानसभा निवडणुकांमुळे मिळणार आहे. तिचा पुरेपूर उपयोग काश्मिरी जनता करील यात शंका नाही. लोकसभेला जम्मूमध्ये भाजपने चांगले यश मिळवले होते. काश्मीर खोऱ्यात मात्र त्याला अजिबात थारा नाही. भाजपने तेथे उमेदवारच दिला नव्हता. यावेळी विधानसभेत आपल्यालाच बहुमत मिळेल असा भाजपचा दावा आहे. तसे खरेच झाले तर ३७० कलम रद्द झाल्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्यासारखे होईल. तसे होऊ नये असे वाटत असेल तर भाजपला काश्मीर खोऱ्यातही आपला प्रभाव दाखवावा लागेल. त्यासाठी भाजपने इतर राज्यांप्रमाणे येथेही छोट्या जाती, आजवर सत्तेच्या बाहेर राहिलेले आदिवासी इत्यादींना हाताशी धरले आहे. शियावर्गीय मुस्लिमांकडून पाठिंबा मिळवण्याचे व त्यांच्यातल्या काहींना उमेदवारी देण्याचे डावपेच भाजपने आखले आहेत. विरुध्द बाजूला काँग्रेस आणि फारूख अब्दुल्ला यांची नॅशनल कॉन्फरन्स यांनी युती केली आहे. त्यांचे जागावाटपही जाहीर झाले असून काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील. लोकसभेला काश्मिरात ५८ टक्के मतदान झाले होते. त्यामुळे लोकशाही प्रक्रियेसाठी जनता उत्सुक व तयार आहे. हे ओळखून काँग्रेस व मित्रपक्षांना आपले धोरण ठरवावे लागेल.

विचार

# युक्रेन भेटीचा संदेश काय?

**युद्ध हा कोणत्याही समस्येवरचा मार्ग नाही; संवादाचे दरवाजे खुले ठेवणे तसेच वाटाघाटी आणि शांततेच्या मार्गानेच युद्धातून मार्ग काढणे महत्वाचे आहे, हे नरेंद्र मोदी यांनी ताज्या युक्रेन दौऱ्यात पुन्हा बजावून सांगितले. त्याचा काही परिणाम होतो का, हे आता पहायचे. दरम्यान, व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या युक्रेनबरोबर झालेल्या ताज्या करारांमुळे कृषी, अन्न उद्योग, औषध, संस्कृती आदी क्षेत्रांमध्ये सहकार्य सुनिश्चित होईल.**

प्रा.डॉ. विजयकुमार पोटे

गेल्या अडीच वर्षांपासून रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू असून युद्धाच्या झळा या दोन देशांपुरत्याच मर्यादित राहिलेल्या नाहीत; अवघे जग त्यात होरपळत आहे. भारताने या युद्धाबद्दल थेट रशियाचा निषेध केला नसला, तरी युद्ध हा कोणत्याही समस्येवरचा मार्ग नाही. संवादाचे दरवाजे खुले ठेवणे हाच मार्ग असल्याचे वारंवार स्पष्ट केले आहे. रशिया हा भारताचा जसा मित्र आहे, तसाच युक्रेनही व्यापारीदृष्ट्या भारतासाठी महत्त्वाचा देश आहे. त्यामुळे दोन्ही देशांशी भारताला चांगले संबंध ठेवायचे आहेत. त्यामुळे तर तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचा दौरा केला आणि त्यानंतर आता युक्रेनला भेट दिली. सोव्हिएत महासंघातून १९९२ मध्ये बाहेर पडल्यानंतर युक्रेन हा देश स्वतंत्र झाला. स्वतंत्र राष्ट्र झाल्यानंतर युक्रेनला भेट देणारे मोदी हे पहिलेच भारतीय पंतप्रधान आहेत. साहजिकच पंतप्रधानांच्या युक्रेन दौऱ्याकडून सर्वांना मोठ्या अपेक्षा होत्या. तेथे रवाना होण्यापूर्वी खुद्द मोदी खूप उत्साहात होते. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांना भेटण्यास उत्सुक असल्याचे त्यांनी सांगितले होते. झेलेन्स्की यांनी त्यांचे अतिशय प्रेमाने स्वागत केले आणि तेथील युद्ध परिस्थितीची माहिती दिली. दोन्ही नेत्यांमधील चर्चेत युद्ध थांबवण्याचे मार्ग शोधण्यावर भर होता. वाटाघाटी आणि शांततेच्या मार्गानेच युद्धातून मार्ग निघू शकतो, असा कानमंत्र पुन्हा मोदी यांनी झेलेन्स्की यांना दिला आहे. दोन्ही देशांनी चार करारांवर स्वाक्षऱ्याही केल्या. या करारांमुळे कृषी, अन्न उद्योग, औषध, संस्कृती आणि मानवतावादी सहाय्य या क्षेत्रात सहकार्य सुनिश्चित होईल.

पंतप्रधानांच्या युक्रेन दौऱ्यावर जगाचे लक्ष होते. कारण रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेले युद्ध केवळ भारतच थांबवू शकतो, हे सुरुवातीपासूनच अधोरेखित केले जात होते; मात्र भारत सुरुवातीपासूनच दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांना युद्धाचा मार्ग सोडण्याचे आवाहन करत आहे. युक्रेनला रवाना होण्यापूर्वीच पंतप्रधान म्हणाले होते की ही युद्धाची वेळ नाही. युद्ध कोणतीही समस्या सोडवू शकत नाही. युक्रेनपूर्वी पंतप्रधान रशियालाही गेले होते. तेव्हा झेलेन्स्की यांनी नाराजी व्यक्त केली होती. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमिर पुतीन हे जगातील सर्वात मोठे गुन्हेगार असल्याचे सांगून मोदी यांनी त्यांना मिठी मारल्याबद्दल त्यांनी टीका केली होती; पण आता ते भारतासोबतचे संबंध अधिक दृढ करण्यासाठी उत्सुक दिसत होते. पंतप्रधानांचा युक्रेन दौरा अशा वेळी झाला, जेव्हा युक्रेनने रशियन प्रदेशांवर हल्ले तीव्र केले आहेत. हे पाहता पंतप्रधानांच्या आवाहनाचा युक्रेन किंवा रशियावर कितपत परिणाम होईल हे सांगणे कठीण आहे. यापूर्वी अनेक प्रसंगी मोदी यांनी पुतीन यांना फोनवर किंवा समोरासमोर बोलून युक्रेनवरील हल्ले थांबवण्याचे आवाहन केले आहे. नुकत्याच झालेल्या रशियाच्या दौऱ्यातही मोदी यांनी पुतीन यांना असेच आवाहन केले होते; पण आजपर्यंत असा एकही प्रसंग दिसला नाही, जेव्हा रशियाने भारताच्या आवाहनाबाबत गांभीर्य दाखवले असेल. शांघाय शिखर परिषदेदरम्यान समोरासमोर चर्चेनंतर पुतीन यांनी भारतीय पंतप्रधानांचे आवाहन गांभीर्याने घेतल्याचे दिसत होते; मात्र तेथून परतताच त्यांनी युक्रेनवरील हल्ले अधिक तीव्र केले.

रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम संपूर्ण जगावर झाला आहे. युक्रेनमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक मारले गेले आहेत, त्यांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. युक्रेनचा व्यापार विस्कळीत झाला आहे. त्याला युद्धबंदीचा करार हवा आहे, पण तो रशियाच्या अटी मान्य करायला तयार नाही. युक्रेनने 'नाटो'चे सदस्यत्व सोडावे, अशी रशियाची अट आहे. दोघांपैकी कोणीही कोणत्याही प्रकारे झुकायला तयार दिसत नाही. अशा स्थितीत आपण वाटाघाटीसाठी कसे बसू शकतो, हा सर्वात कठीण प्रश्न आहे. भारतालाही त्यांच्यासाठी संवादाचा मार्ग शोधणे सोपे नाही; पण पंतप्रधानांनी दोन्ही देशांचे एक एक करून केलेले दौरे आणि युद्धाचा मार्ग सोडण्याचे केलेले आवाहन यामुळे जागतिक बंधुतेचा मार्ग मोकळा झाला आहे. रशिया आणि युक्रेन काहीसा लवचिक दृष्टिकोन स्वीकारतील आणि करारासाठी मध्यम मार्ग अवलंबण्यास सहमत होतील, अशी अपेक्षा आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्या खांद्यावर हात ठेवून पंतप्रधान मोदींनी एक-दोन नव्हे तर तीन महत्त्वाची पावले उचलली आहेत. मोदी यांनी झेलेन्स्की यांच्याशी अर्थपूर्ण चर्चा केली आणि रशियासोबत सुरू असलेले युद्ध संपवण्यासाठी वैयक्तिकरित्या योगदान देण्याचे आश्वासन दिले. मोदी यांनी 'एक्स'वर लिहिले, की युक्रेन भेट ऐतिहासिक होती. भारत-युक्रेन मैत्री आणखी घट्ट करण्याच्या उद्देशाने मी या महान देशात आलो आहे. माझे झेलेन्स्की यांच्याशी फलदायी संभाषण झाले. शांतता कायम राहिली पाहिजे, यावर भारताचा ठाम विश्वास आहे.

मोदी यांनी झेलेन्स्की यांच्याशी व्यापक चर्चा केली. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी रशियाने युक्रेनवर हल्ला केला. तेव्हापासून आजतागायत दोन्ही देशांमध्ये युद्ध सुरूच आहे. मोदी आणि झेलेन्स्की यांनी युक्रेनमधील शांतता आणि सुरक्षेबाबतही चर्चा केली. रशिया-युक्रेन युद्धादरम्यान भारत तटस्थ किंवा उदासीन प्रेक्षक नव्हता आणि नेहमीच शांततेच्या बाजूने होता, असे मोदी म्हणाले. दोन्ही देशांच्या प्रमुख नेत्यांची भेट जगासाठी मोठा संदेश आहे. त्यांच्यातील द्विपक्षीय बैठकीमुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होतील. रशियासोबतच्या युद्धावर शांततापूर्ण वाटाघाटीतून तोडगा काढण्याच्या दिशेने दोन्ही देश वाटचाल करतील. मोदी यांच्या युक्रेन आणि पोलंड दौऱ्यानंतर अमेरिकेसह पाश्चात्य देशांना खात्री पटली आहे की भारत युक्रेनसोबत एकत्र पुढे जात आहे. म्हणजे भारताचा कल ना रशियाकडे आहे ना पाश्चात्य देशांकडे. जागतिक राजकीय पटलावर भारत तोच मार्ग स्वीकारेल, जो भारत आणि जगासाठी चांगला असेल हे सर्व देशांना कळून चुकले आहे. आज तीन आघाड्यांवर भारताची नजर आहे. पहिली गोष्ट म्हणजे युरोपच्या शांतता उपक्रमात भारताचा समावेश करणे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे युक्रेनवरील रशियन आक्रमणामुळे निर्माण झालेल्या जागतिक भू-राजकीय गोंधळात भारताचा सहभाग वाढवणे आणि तिसरा मुद्दा म्हणजे सोव्हिएत काळापासून थंडावलेले युक्रेनसोबतचे भारताचे राजनैतिक संबंध पुनरुज्जीवित करणे.

युक्रेनमधील युद्ध संपवण्याच्या प्रश्नावर पंतप्रधान मोदी यांच्याकडे कोणतीही भव्य योजना नाही, असे पूर्वी दिसत होते. युद्ध आणि शांतता या विषयावर झेलेन्स्की यांच्याशी दीर्घ आणि सखोल चर्चेसाठी मोदी यांचा वॉर्सा ते युक्रेन ते कीव असा लांब रेल्वे प्रवास हा एक महत्त्वाचा टप्पा मानला गेला. कीव्हला दुसरी शांतता योजना हवी होती. मोदी यांनी युक्रेनच्या चिंता समजून घेतल्या. राष्ट्र म्हणून अस्तित्वाच्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या होत्या. युक्रेनला या मुद्द्यावर भारताकडून पाठिंबा मिळत नव्हता. झेलेन्स्की यांना आशा आहे की, युक्रेनचे प्रकरण ऐकण्यासाठी आणि शांतता प्रयत्नांना हातभार लावण्याची मोदी यांची इच्छा त्यांच्याबद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करेल. कारण युद्धाचे प्रचंड आर्थिक परिणाम असूनही दक्षिणेतील मोठा भाग अलिप्त राहिला आहे. दुसरीकडे, युक्रेनमधील युद्धाचे भू-राजकीय परिणाम समोर येत असताना, मोदी यांची कीव भेट हे जगाला नव्याने आकार देणाऱ्या संघर्षात भारत यापुढे मूक प्रेक्षक म्हणून राहणार नाही, याचे द्योतक आहे. मोदी वॉर्सा ते कीव असा प्रवास करत असताना चीनचे पंतप्रधान ली कियांग मॉस्कोला भेट देत होते. युक्रेनमधील युद्धाची रूपरेषा तयार करण्यात चीनच्या वाढत्या भूमिकेची ही झलक आहे. भारत आपल्या हिताला महत्त्व देत आहे. अमेरिकेत युरोपपासून दूर जाण्याच्या रिपब्लिकन कल्पनेला आता डेमोक्रॅट्सकडून आव्हान दिले जात आहे. त्या चर्चेच्या निकालाचा भारताच्या सुरक्षा धोरणावर मोठा परिणाम होईल.

सरत्या आठवड्यात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या वॉशिंग्टनमधील उपस्थितीने अमेरिकेशी भारताचे वाढणारे धोरणात्मक संबंध अधोरेखित केले, तर राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि झेलेन्स्की यांच्याशी मोदी यांच्या जलद भेटींनी त्यांच्या हितसंबंधांवर प्रकाश टाकला. भारत आणि युक्रेनमधील संबंध मजबूत करणे, भारत आणि युक्रेनमधील द्विपक्षीय संबंध पुनर्संचयित करण्याच्या दृष्टीनेही मोदी यांचा युक्रेन दौरा महत्त्वाचा होता. सोव्हिएत काळात, भारताला युक्रेनमध्ये प्रवेशाचा विशेषाधिकार होता; परंतु कीवला स्वातंत्र्यानंतर भारतासोबतच्या संबंधांमध्ये कोणतीही उबदारता लाभली नाही. युक्रेनमध्ये भारताप्रती असलेली विलक्षण सद्भावना मोदी यांच्या कीवमध्ये झालेल्या हार्दिक स्वागतातून दिसून आली. मोदी आणि झेलेन्स्की यांनी आपल्या संबंधांना धोरणात्मक भागीदारीमध्ये रूपांतरित करण्याची, त्यांच्या आर्थिक आणि संरक्षण संबंधांना पुनरुज्जीवित करण्याची आणि सांस्कृतिक संबंधांना पुनरुज्जीवित करण्याची दाखवलेली वचनबद्धता युक्रेन आणि भारत दोघांसाठीही महत्वाची महत्त्वाची आहे.

विशेष

# जागतिक नारळ दिवस ...

शांताराम वाघ

सर्वांच्या परिचयाचा नारळ हे फळ सर्वानाच अतिशय प्रिय आहे. भारतीय संस्कृतीत आदराने एकमेकांचा सत्कार करताना नारळ वापरतात. हे फळ शुभदायी मानले आहे आजही देवघरात नारळ हे फळ अतिशय श्रद्धेने पूजिले जाते अनेक मंदिरामध्ये याचा उपयोग केला जातो. ह्या झाडांचे इतके उपयोग आहेत कि त्याचा कोणताही भाग वाया जात नाही त्याचे पाणी, खोबरे, तेल वापरतात. त्याच्या झावळ्यांपासून खराटे, टोपली, घराचे छत, चटई तसेच दोरखंड बनवितात खोडा पासून शोभेच्या वस्तू तसेच फर्निचर बनविले जाते नारळाची करवंटी शेकोटी साठी उपयोगी पडते तसेच त्याचा इंधनासाठी वापर होतो. नारळाचा भुसा जाळून त्या पासून डास नष्ट होतात. म्हणूनच नारळाला भारतीय संस्कृतीत कल्पवृक्ष असे म्हटले जाते. जगात ८० वेगवेगळ्या देशात १५० पेक्षा जास्त प्रजाती आहेत. नवीन झाडांचे फळ येण्यास ५- ते ६ वर्षाचा कालावधी लागतो. झाडांचे फळ पिकण्यास एक वर्षाचा कालावधी लागतो. दरवर्षी नारळाचे उत्पादन ६१ दशलक्ष टन नारळ एवढे प्रचंड होते जंगलात हे नारळाचे झाड १०० वर्षापर्यंत राहू शकते. नारळाचे फळ हे समुद्रात सुद्धा तरंगू शकते पक्व झालेल्या नारळाच्या झाडाखाली उभे राहिल्यास ते नारळ डोक्यात पडून अनेकांचा मृत्यू सुद्धा झाल्याची उदाहरणे आहेत. एखाद्या निर्जन बेटावर जर तुम्ही अडकले आहेत तर नारळ हा तुमचा अगदी जिवलग मित्रच आहे. आज अनेक देश ज्यात भारत, फिलिपाइन्स, ब्राझील, श्रीलंका इत्यादी आहेत हे देश नारळ निर्यात सुद्धा करतात.

विषुववृत्तीय व उष्ण कटिबंधात हे वृक्ष वाढतात ही झाडे मुख्यत्वे करून समुद्र किनारी असतात ३० मीटर उंचीच्या या वृक्षाला ४ ते ६ मीटर उंचीची पाने झावळ्यांच्या स्वरूपात फुटतात भारतात नारळ उत्पादन अनेक ठिकाणी घेतले जाते. केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामीळनाडू, पश्चिम बंगाल, ओरिसा या राज्यात नारळाचे उत्पादन घेतले जाते. आज जगात नारळ उत्पादनात भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. एकट्या आशिया खंडात जगातील नारळ उत्पादनाच्या ९० टक्के उत्पादन होते. एका नारळाच्या झाडाला सर्वसाधारण पणे १०० ते १५० नारळ वर्ष भरात लागतात. जगात आज इंडोनेशिया, फिलिपाइन्स, ब्राझील, श्रीलंका या देशात नारळाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते नारळाच्या झाडाचे विविध उपयोग आहेत. नारळाच्या झाडापासून निघणाऱ्या नारळाचा उपयोग खाद्यपदार्थात मोठ्या प्रमाणावर केला जातो त्याचे तेल केसाला वापरले जाते इतकेच क्या पण खाद्य तेल म्हणूनही त्याचा वापर अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात केला जातो. नारळाचे शहाळे अतिशय औषधी मानले आहे ते शक्ती संपन्न व खनिज संपन्न असते. आजारी तसेच अपचन झालेल्या माणसाला ते उपयुक्त आहे. याशिवाय नारळाच्या फळाच्या बुंध्याला एक भोक पाडले जाते त्यातून येणार पांढरा रस म्हणजेच माडी होय. सुरवातीस ही माडी थंडगार व अतिशय मधुर असते. समुद किनाऱ्यावर नारळाची झाडे मोठ्या प्रमाणात दिसून येतात. नारळाच्या तेलाचा वापर त्वचा निर्मल व नितळ राखण्यासाठी केला जातो. गर्भधारणेनंतर दोन ते तीन आठवड्यांनी हे तेल घेतल्यास बाळाची कांती सुधारते. टॉनिक म्हणून सुद्धा ते उपयुक्त आहे. नारळाचे तेल हृदयास अतिशय उपयुक्त आहे ते केसाला नियमितपणे लावल्यास केस मुलायम होतात. तसेच केस गळण्याचे प्रमाण कमी होते. तसेच वजन



घटण्यास सुद्धा ते उपयुक्त आहे. मेंदूची क्षमता वाढते. या तेलात ब्रेन बुस्टिंग गुणधर्म आहेत तसेच स्मृती व बुद्धी तल्लख होण्यास याचा मोठा उपयोग आहे एकूणच नारळाच्या तेलात औषधी गुणधर्म मोठ्या प्रमाणात आहेत. एका नारळात २०० मिली एवढे पाणी मिळते. या मधेय रेडियम व कोबाल्ट असतात. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती निर्माण होते. अनेक डॉक्टर कॅन्सर सारख्या रोगावर नारळाचे पाणी पिणे हा उपाय सुचवितात. अगदी कोरोना काळात सुद्धा अनेक डॉक्टरांनी कोरोनावर नारळाचे पाणी हा उपाय सुचविला होता. जागतिक नारळ दिवस हा २००९ पासून जगभर साजरा केला जातो. आशिया पॅसिफिक कोकोनट कॉम्युनिटी हेड क्वार्टर्स जकार्ता यांनी हा दिवस प्रथम साजरा करण्यास सुरवात केली नारळाच्या लागवडीला प्रोत्साहन देणे, तसेच त्याबद्दल लोकांच्यात जागरूकता निर्माण करणे ही कामे या दिवशी केली जातात. नारळाचे महत्व या दिवशी सांगितले जाते. नारळाची लोकांच्या मध्ये जागृती करण्याचा हा दिवस आहे आजही शहरात अनेक ठिकाणी नारळाची झाडे मोठ्या प्रमाणावर दिसतात. आज या नारळ दिवसा निमित्त नारळाचे अनेक फायदे लोकांच्या पर्यंत पोहोचवूया व त्याचा उपयोग जास्तीत जास्त करूया. नवीन झाडांची लागवड करूया. हाच खरा संदेश या दिवसाचा आहे असेच म्हणता येईल. आपण जसे इतर वृक्ष लावितो त्यापेक्षा नारळाचे झाड लावणे केव्हाही उपयुक्त आहे. जे आपल्या झाडाचा सर्व भाग मानवाला वापरावयाला देते. म्हणूनच नारळाला कल्पवृक्ष अशी संज्ञा दिली आहे.

लोकसंसद

## लॉर्ड्सवर जो रूटची दोन्ही डावात शतके!

इंग्लंडच्या लॉर्ड्स मैदानावर श्रीलंकेविरुद्ध सुरु आलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात इंग्लंड क्रिकेट संघाच्या जो रूटने पहिल्या डावात १४३ धावा आणि दुसऱ्या डावात १०३ धावा करून दोन्ही डावात शतके झळकावण्याचा पराक्रम केला. गेल्या १४० वर्षांच्या इतिहासात लॉर्ड्सवर कसोटीच्या दोन्ही डावात शतके झळकावणारा जॉर्ज हॅडली (वेस्ट इंडीज, वर्ष १९३९), ग्रॅहम गूच (इंग्लंड, वर्ष १९९०) मायकल वॉन (इंग्लंड, वर्ष २००४) तो केवळ चौथा फलंदाज ठरला. खरे तर क्रिकेटची जन्मभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लॉर्ड्स क्रिकेट स्टेडियमवर शतक झळकावणे हे जगभरातील प्रत्येक फलंदाजाचे स्वप्न असते. आतापर्यंत या मैदानावर २५१ शतके नोंदली गेली आहेत. विनू मंकड, गुंडाप्पा विश्वनाथ, दिलीप वेंगसरकर, रवी शास्त्री, मोहम्मद अझहरुद्दीन, सौरव गांगुली, अजित आगरकर, राहुल द्रविड, अजिंक्य रहाणे आणि के एल राहुल या १० भारतीय खेळाडूंनी लॉर्ड्सवर शतक ठोकले आहे. त्यापैकी दिलीप वेंगसरकरने लॉर्ड्सवर तीनदा शतक ठोकण्याचा पराक्रम केला आहे. भारताचा दिलीप वेंगसरकर हा एकमेव परदेशी खेळाडू आहे ज्याने लॉर्ड्स मैदानावर ३ कसोटी शतके झळकावली आहेत.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२ सप्टेंबर**

**१८८६:-** 'उपेक्षितांचे अंतरंग' या कथासंग्रहाद्वारे दलितांची दुःखे मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहात आणणारे श्रीपाद महादेव माटे यांचा जन्म. 'अनामिक', 'माणुसकीचा गहिवर', 'भावनांचे पाझर' आदी त्यांची पुस्तके ही उपेक्षितांच्या अंतरंगाकडे पाहणारी आहेत. याखेरीज 'रामदासांचे प्रपंच विज्ञान', 'मराठी भाषेच्या विकासाबद्दलचे 'रसवंतीची जन्मकथा, मराठी काव्येतिहास सटीक मांडणारे 'संत, पंत, तंत' अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली होती. त्याकाळी अस्पृश्योध्दाराचे कार्यहाती घेऊन 'अस्पृष्ट्यांचा प्रश्न', 'परशुरामचरित्र व पंचमानव', 'हिंदु समाजभाषेच्या विकासाबद्दल रसवंतीची जन्मकथा' अशी पुस्तके लिहिली. याशिवाय विविध विषयांवर लेखन केले. त्यात साहित्यधारा, विचारशलाका, विवेकमंडन हे त्यांच्या स्पुटलेखांचे संग्रह. तसेच कर्तबगार स्त्रिया, बारा शास्त्रज्ञ ही त्यांची चरित्रात्मक पुस्तके. तसेच 'चित्रपट' हे त्यांचे आत्मचरित्रात्मक पुस्तक प्रसिध्द. माट्यांनी विज्ञानाच्या अनेक शाखांचा सामान्य वाचकांना परिचय करुन देणारा 'विज्ञानबोध' हा ग्रंथ तसेच 'महाराष्ट्र सांवत्सरिक' आणि 'हिंदूसमाजदर्शन' ह्या त्यांच्या ग्रंथांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली. केसरीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त 'केसरी-प्रबोध तर तात्यासाहेब केळकरांवर 'केळकर गौरवग्रंथ' हे त्यांचे संपादित ग्रंथ. आधुनिक मराठी वाङ्‌मय क्षेत्रातील एक बहुजनभिमुख विचारवंत म्हणून माट्यांचे नाव आदराने घेतले जाते. **१९१५:-** लेखक प्राचार्य डॉ. दिनानाथ गजानन नाईक यांचा जन्म. 'अनंत शिवाजी' ह्या चरित्रवजा ग्रंथासह 'जीवन ह्याला नाव', 'माझी वाटचाल' हे आत्मचरित्र, 'श्रीदत्तगिरी महाराज' अशी ग्रंथसंपदा. **१९२३:-** लेखक, गोरक्षणाचे प्रचारक, गोवर्धनदास शंकर डोळे यांचा जन्म. 'गोवर्धन', 'प्रपंच', 'महात्मा', 'सज्जनगड', 'प्रसाद' आदी नियतकालिकांतून लेखन. ह्यांचे 'गांधीगीतगंगा', 'मातृगीता', 'संगीत' आदी काव्यसंग्रह प्रसिध्द झाले आहेत. **१९२८:-** लेखिका कुसूम देशमुख यांचा जन्म. 'दर्पण' हा काव्यसंग्रह आणि 'वंचीत, अमोल, अस्मिता' हे काव्यसंग्रह प्रसिध्द. **१९३८:-** लेखिका वासंती क. नाडकर्णी यांचा जन्म. 'कौमुदी', 'प्यादी' हे लघुकथा संग्रह त्यांच्या नावावर आहेत. **१९३८:-**लेखक, भगवतभक्त प्रसारक संत लक्ष्मणनाथ डुडीजी लेंडे यांचा जन्म. 'अभंगगाथा', 'स्वानुभव के बोल', 'अभंगगंगा भाग १' हे अभंगसंग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहेत. **१९४०:-** बालसाहित्यिका रेचल अब्राहम गडकर यांचा जन्म. ह्यांचे 'आधार', 'आम्हीच शहाणे', 'आळशी नव्हरा', 'जाणीव', 'प्रतिज्ञा', 'हट्टी निलांबरी' मिळून १५ बालनाटिका आणि 'एका होता मोत्या', 'एक होता राजा', 'बारा भाऊ', 'ससोबा गेले शाळेत', 'मुंगीने फुंकले शिंग' हे कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. **१९४०:-** लेखक, प्रवचनकार, भागवतकार डॉ. भा. शि. भोयर यांचा जन्म. 'वाचतापानी' ह्या झाडी कवितासंग्रहसह 'रोवणी', 'मोहर' मिळून नऊ काव्यसंग्रह. 'गाव बुल्ला' या झाडी कादंबरीसह 'चित्रलेखा', 'मऱ्यान' मिळून पाच कादंबऱ्या. तसेच 'सौंदर्यात्मक समीक्षा भाग १ ते ३', 'वैनगंगा', 'बोलीभाषा : भाषाशास्त्रीय विचार' हे समीक्षात्मक ग्रंथ. याशिवाय 'तुकारामाची सामाजिक दृष्टी','जे पाहिले ते हे वैचारिक' आणि काही संपादन त्यांच्या नावावर आढळते. **१९४२:-** इतिहास विषयक पुस्तकांचे लेखकडॉ. शब्बीर शेख यांचा जन्म. अर्वाचीन जगाचा इतिहास, 'जगाचा सांस्कृतिक इतिहास', 'भारताचा इतिहास', 'भारतीय समाज सामाजिक समस्या', 'समाजशास्त्र' अशी ग्रंथसंपदा प्रसिध्द. **१९४९:-** कथा, कादंबरी, प्रवासवर्णन आदी स्वरुपाचे लेखन करणारे शाम शिंदे यांचा जन्म. 'सर्पधन' हा ग्रामीण कथासंग्रह, 'रणधुमाळी' ही निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर गाजलेली कादंबरी.तसेच 'चिमाजी' ह्या कादंबरीतून एका दलित महिलेची व्यथाआणि 'पुणे ते युरोप', 'सफर इजिप्तची', 'सफर दक्षिणपूर्व आशिया' ही प्रवास वर्णनात्मक पुस्तके मिळून वीस एक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९६२:-** ऐतिहासिकविषयांवर लेखन करणारे प्रा. डॉ. अनिल सिंगारे यांचा जन्म. ह्यांच्या 'दक्षिण भारताचा इतिहास', 'भारताचा इतिहास', 'इतिहासकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर', 'महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास', 'अमेरिकेचा इतिहास', 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास' मिळून दहाहून अधिक पुस्तके लिहिलीत. **१९६७:-** दत्तात्रय यशवंत चितळकर यांचा जन्म. यांचे 'अध्यात्मविज्ञान आणिसंस्कार मुल्य' यातून अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घातली आहे. तसेच 'कष्टाच पीठ' हा ग्रामीण कथासंग्रह. **१९७०:-** लेखक प्राचार्य पवन मांडवकर यांचा जन्म. 'गाढव गोष्टी', 'झंपू' या बालकथासंग्रह 'डेडलॉक', 'विरह' या कादंबऱ्यातसेच 'अपूर्ण संघर्ष', 'मी अनामिका बोलतेय', 'दीपशिखा' हे कथासंग्रह आणि 'प्रेमकविता', 'किलकिलाट' हे काव्यसंग्रह.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२ सप्टेंबर

१) श्रीम. शुभलक्ष्मी सुभाष वैद्य
चेंढरे, २-९-१९४४
२) श्रीम. अपर्णा अशोक म्हात्रे
अलिबाग, २-९-१९४७
३) श्रीम. सुनंदा गोपीनाथ रूईकर
अलिबाग, २-९-१९४७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**
**शकुंतला रामेश्वर कर्वे जयंतीनिमित्त अलिबाग**

# ‘बेलापूर’वर डोळा ठेवू नका

## ■ आमदार मंदा म्हात्रेंनी दिला आमदार गणेश नाईकांना इशारा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**
**कोणाच्या बापाचं राज्य नाही. बाप काढल्यावर यांना राग येतो, अशा शब्दांत भाजपच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी त्याच्याच पक्षांतील आमदार गणेश नाईक यांच्यावर शाब्दीक हल्ला केला. ऐरोलीमध्ये यांना सगळे सोडून गेले म्हणून आता बेलापूर मतदारसंघावर यांचा डोळा आहे. पण लोकांना सगळं समजतं. कोण मेहनत करतं आणि कोण आयत्या जागेवर येतं. ही बाब मतदार जाणतात, अशा शब्दांत म्हात्रे यांनी नाईक यांच्यावर बोचरी टीका केली.**

बेलापूरमध्ये सुपर स्पेशॅलिटी रुग्णालयासाठी निविदा प्रक्रिया सुरु झाल्याबद्दल आनंद व्यक्त करत म्हात्रेंनी नाईकांचा समाचार घेतला. स्वत: काम करायचं नाही आणि मी काम करायला गेले की त्यात खो घालायचा. पालिकेनं निधी दिला नाही म्हणतात. मग तुम्ही काय करत होतात. तुम्ही तर पालकमंत्री होतात. तुम्हाला का निधी आणता आला नाही, असा सवाल त्यांनी विचारला.

रुग्णालयाचं काम सुरु झालं आहे. त्यामुळे लोकांना दिलासा मिळाला आहे. यामुळे स्थानिकांना रोजगार मिळेल. या कामात आडकाठी आणू नका. अन्यथा मग भांडाफोड करावा लागेल. कोविड काळातल्या फाईल माझ्याकडे आहेत. किती लॅबमध्ये कुठे कुठे गेले? सगळ्या फाईल आहेत. काढू का कोविड काळातली एक तरी फाईल? कोविड काळात कोणी पैसे लुटले?





असे सवाल करत म्हात्रेंनी नाईकांवर निशाणा साधला. गेल्या काही महिन्यांपासून भाजप नेते संदीप नाईक बेलापूर मतदारसंघात सक्रिय झाले आहेत. म्हात्रेंच्या मतदारसंघात त्यांनी संपर्क कार्यालय उघडलं आहे. बेलापूरमधून विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी नाईक यांची तयारी सुरु झाल्यानं म्हात्रे सावध झाल्या आहेत. त्यामुळे एकाच पक्षात असलेल्या नाईक आणि म्हात्रे यांच्यात ठिणग्या पडू लागल्या आहेत. त्यामुळे नवी मुंबई भाजपमध्ये सगळं काही आलबेल नसल्याचं चित्र पुन्हा एकदा दिसू लागलं आहे.

गणेश नाईक ऐरोलीचे आमदार आहेत. तर मंदा म्हात्रे बेलापूरच्या आमदार आहेत. गणेश नाईक यांना ऐरोलीतून पुन्हा एकदा विधानसभेची उमेदवारी हवी आहे. पण हा मतदारसंघ मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा बालेकिल्ला मानला जातो. इथून शिंदेसेनेच्या विजय चौगुले यांचं तिकीट जवळपास निश्चित मानलं जात आहे. त्यामुळे नाईक यांना मतदारसंघावर पाणी सोडावं लागू शकतं. शिंदे आणि नाईक यांचं विळ्याभोपळ्याचं नातं आहे. लोकसभा निवडणुकीवेळी ठाण्याची जागा शिंदेसेनेला सुटल्यानं नाईक नाराज झाले. त्यांनी विषय राजीनाम्यापर्यंत नेल्यानं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्यावर नाराज असल्याचं समजतं. ऐरोलीची जागा शिंदेसेनेला सुटण्याची शक्यता असल्यानं नाईक यांनी मंदा म्हात्रेंच्या बेलापूर मतदारसंघात तयारी सुरु केली आहे. गणेश नाईक यांच्या मुलालादेखील विधानसभेचं तिकीट हवं आहे. त्यामुळे म्हात्रे आणि नाईक यांच्यात ठिणग्या पडू लागल्या आहेत. मंदा म्हात्रे बेलापूरची जागा सोडण्यास तयार नाहीत. २०१४, २०१९ मध्ये त्यांनी विजय मिळवलेला आहे. त्यामुळे आता त्या हॅट्ट्रिक करण्याच्या तयारीला लागलेल्या आहेत.

# ‘स्पर्धात्मक युगात आव्हाने स्वीकारा’

**। कुडाळ । वृत्तसंस्था ।**
स्पर्धात्मक युगात वाटचाल करताना आव्हाने स्वीकारली पाहिजेत. जिद्द, चिकाटी, मेहनत या त्रिसूत्रीला आत्मविश्वासाची जोड द्या, असे प्रतिपादन कुडाळ तहसीलदार वीरसिंग वसावे यांनी मांडकुली येथे केले. श्रीमती मनोरमा महादेव चौधरी चॅरिटेबल ट्रस्ट वालावल संस्थेच्यावतीने आयोजित शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

मागासवर्गीय एज्युकेशन सोसायटी मांडकुली-केरवडे संचलित प. पू. आप्पासाहेब पटवर्धन माध्यमित विद्यालयात (कै.) मनोरमा महादेव चौधरी चॅरीटेबल ट्रस्ट वालावल संस्थेकडून प्रशालेत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला मनोरमा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष दयानंद चौधरी, कुडाळ ट्रस्टचे सचिव संदीप साळसकर, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष रुपेश कानडे, संस्था सचिव अंकुश जाधव, खजिनदार अर्जुन परब, उपखजिनदार करिष्मा भोई, संचालक सतीश पडते, वामन गावडे, शिक्षक-पालक संघ उपाध्यक्ष बाबाजी पेडणेकर, देवदत्त चुबे, मुख्याध्यापक सुरेंद्र खोत, गिरीश सरवटे, अनिल गोवेकर, प्रज्ञा रांगणेकर, राहुल कानडे आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक खोत यांनी परिचय केला.

चौधरी ट्रस्टच्यावतीने विद्यार्थ्यांना विविध साहित्य वितरण केले. सूर्यकांत बागवे यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली. तहसीलदार वसावे यांनी स्पर्धा परीक्षा व करिअर संधी याबाबत मार्गदर्शन करून पुन्हा प्रशालेस भेट देऊन पालक व विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेऊ, असे सांगितले. दयानंद चौधरी यांनी ग्रामीण भागात शाळा असूनही चांगले काम चालू असून, ट्रस्टकडून प्रशालेला स्मार्ट टीव्ही देण्याचे व विविध गरजा पूर्ण करण्यासाठी नेहमीच सहकार्य करण्याचे आश्वासित केले. रुपेश कानडे यांनी प्रशालेच्या शैक्षणिक प्रगतीबाबत कौतुक करून प्रशालेला सहकार्याचे आश्वासन दिले.

# पोलीस तपास अधिकारी बदलण्याची मागणी

## माडखोलवासीय आक्रमक

**। सावंतवाडी । वृत्तसंस्था ।**
माडखोल येथे घडलेल्या आत्महत्या प्रकरणाचा तपास चुकीच्या पद्धतीने केला जात आहे. त्यामुळे हा तपास दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे द्यावा, अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी करत येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयासमोर आत्मक्लेश आंदोलन केले. चुकीच्या पद्धतीने तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचा निषेध माडखोलवासीयांनी केला.

यावेळी पोलीस निरीक्षकांनी आंदोलकांना सामोरे जात त्यांच्या भावना समजून घेत कार्यवाहीची ग्वाही दिली. यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या कोकण विभाग महिला अध्यक्षा अर्चना घारे-परब, तालुकाध्यक्ष पुंडलिक दळवी, बावळाट सरपंच सोनाली परब, माडखोल ग्रामस्थ राजकुमार राऊळ, संजय लाड, संतोष राऊळ, संतोष राणे, विशाल राऊळ, संदीप सुकी, मनोज घाटकर, संकेत राऊळ, उल्हास राणे, सत्यवान बंड, प्रमोद बंड, राष्ट्रवादी महिला शहराध्यक्षा ॲड. सायली दुभाषी, शहराध्यक्ष देवेंद्र टेमकर, हिदायतुल्ला खान आदी उपस्थित होते.

राष्ट्रवादीच्या अर्चना घारे यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या कानावर हा प्रकार घातला. महाराष्ट्रात दिवसेंदिवस महिलांवर अत्याचार वाढत असताना हे प्रकरण जबाबदारीने हाताळावे, अशी मागणी केली. माडखोल येथील आत्महत्या प्रकरणात चुकीच्या पद्धतीने तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचा निषेध माडखोलवासीयांनी केला. पोलीस ठाण्यासमोर आत्मक्लेश आंदोलन करत संबंधित अधिकारी बदलण्याची मागणी केली. यावेळी ग्रामस्थांची मागणी वरिष्ठांकडे पोहोचविण्याचे काम करून त्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करू. तपासात सहकार्य करावे. कुठलाही त्रास पोलिसांकडून कधी झालेला नाही आणि होणारही नाही. तपास पूर्ण झाल्याशिवाय कुणावरही कारवाई होणार नाही, असे पोलीस निरीक्षक अमोल चव्हाण यांनी सांगितले.

अर्चना घारे-परब म्हणाल्या, आत्महत्यांविषयीचे तपासकार्य चुकीच्या पद्धतीने सुरू होते. पोलीस अधिकाऱ्यांचे गैरवर्तन त्यात आढळून आले. त्याबाबत जाब विचारण्यासाठी आज पोलीस ठाण्यात धडक दिली. महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या कानावर ही बाब घातली असून, त्यांनी पोलीस निरीक्षकांशी फोनवरून संवाद साधला व सूचना केल्या आहेत. संबंधित तपासी अधिकाऱ्यांना बदलण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## ‘कुणबी समाज विधानसभा लढणार’

**रत्नागिरी :** संगमेश्वर तालुक्यातील कुणबी समाजाला वारंवार विकासापासून वंचित ठेवले जात असून राजकीय क्षेत्रातही अवहेलना केली जात आहे. समाजाचे प्रश्न, अडचणी, आम्हास विचारात न घेतल्याने कुणबी युवा समाजबांधव इर्ष्येने पेटून उठले आहेत. त्यामुळे आपल्या समाजाचा उमेदवार विधानसभेसाठी उभा करण्याचा निर्धार देवरूख येथील कुणबी युवा बांधवांच्या सभेत करण्यात आला.संगमेश्वर तालुका कुणबी समाज युवक मित्रमंडळ यांच्या वतीने कुणबी समाजाच्या विविध प्रश्नांसंदर्भात चर्चा करण्यासाठी देवरूख येथे सभा झाली.

# गणेशोत्सवानिमित्त बाजारपेठा सजल्या

## खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**
गणेशोत्सवाला केवळ काहीच दिवस शिल्लक असल्याने शहरातील बाजारपेठा सजल्या आहेत. दिवसेंदिवस शहरात ग्रामीण भागातून येणाऱ्या गणेशभक्तांची गर्दी वाढत आहे. अलिकडे थर्माकॉलवर बंदी आल्यानंतर गणपतीची सुशोभित आरास तयार करण्यासाठी प्लास्टिक फुले, फोम तसेच पुठ्ठा, कागद यांचा वापर केला जात आहे.

गणेशोत्सवात लागणाऱ्या विविध साहित्याची दुकाने सजली आहेत. अगदी दरबार व निसर्गचित्रांचे पडदे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू विक्रीसाठी आल्या आहेत. गणेशोत्सवाला ७ सप्टेंबरला सुरवात होणार आहे. त्यामुळे भाविकांनी बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी केली आहे.

बाजारपेठेत आकर्षक प्लास्टिक फुले, माळा, फोम, पुठ्ठा, रंगीत कागद, पडदे, इलेक्ट्रिक साहित्यांनी दुकाने भरगच्च भरली आहेत. गणेशोत्सवात आरासासाठी लागणाऱ्या वस्तू ग्राहकांकडून खरेदी केल्या जात आहेत.फूटपाथचा परराज्यातील व्यावसायिकांनी ताबा घेतला आहे. उत्तरप्रदेशातून आलेले हे व्यावसायिक छोटे ताशे, ढोलकी, ढोलक यांची विक्री करत असून बाजारपेठेत फिरूनही विक्री करत आहेत. गणेशोत्सवातच रत्नागिरीत येत असल्याचे उत्तरप्रदेश येथील ढोलक विक्रेत्याने सांगितले तसेच शहरातील फूटपाथवर प्लास्टिकच्या विविध वस्तू, इलेक्ट्रिक सामान विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे. विविध प्रकारच्या रांगोळ्या बाजारपेठेत विक्रीसाठी आल्या आहेत. रामआळी, गोखलेनाका ते मारूती मंदिरपर्यंत भाविकांनी खरेदीसाठी गर्दी केली आहे.

दरम्यान, गतवर्षी जिल्ह्यात १ लाख १५ हजार २३४ घरगुती तर १७ सार्वजनिक गणपतींची प्रतिष्ठापना झाली होती. या पार्श्वभूमीवर पोलीस सतर्क झाले असून, जिल्ह्यात विविध ठिकाणी पथके तयार केली आहेत. अनंत चतुर्दशीपर्यंत वाजतगाजत येणाऱ्या गणेश मिरवणुकीपासून विसर्जनापर्यंत पोलिसदलाचे या उत्सवावर लक्ष राहणार आहे.

# १७० वर्षांनंतर प्रथमच धावणार ट्रेन



## कोकण-गोव्यात जाणाऱ्यांसाठी ठरणार फायदेशीर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
मुंबईहून कोकण आणि गोव्याला जाणासाठी वांद्रे टर्मिनसहून मडगावसाठी नव्याने ट्रेन सुरू झाली आहे. २९ ऑगस्ट रोजी बोरिवली मडगाव जंक्शन येथून नवीन गाडीचा शुभारंभ झाला. विशेष म्हणजे तब्बल १७० वर्षानंतर पहिल्यांदाच वसई पनवेल वरून ट्रेन कोकणात जाणार आहे. पश्चिम रेल्वेने सुरू केलेली ही ट्रेन कायमस्वरुपी आठवड्यातून दोन दिवस असेल. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांना या ट्रेनचा फायदा होणार आहे.

आठवड्यातून दोन दिवस धावणार ट्रेनवांद्रे टर्मिनल ते मडगाव जंक्शन ही गाडी वांद्रे येथून बुधवार आणि शुक्रवारी सुटेल तर मडगाव येथून मंगळवार आणि गुरुवारी सुटेल. मडगाव जंक्शन वांद्रे टर्मिनल (१०११६) आणि वांद्रे टर्मिनल मडगाव जंक्शन (१०११५) या क्रमांकाने या नवीन गाड्या धावणार आहेत. ही गाडी वसई रोड, भिवंडी रोड, पनवेल, रोहा, बीड, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, सिंधुदुर्ग, सावंतवाडी रोड आणि करमाळी या स्थानकावर थांबेल. तर खेडलादेखील थांबा दिला जावा अशी मागणी आहे.

वांद्रे टर्मिनसहून येथून ही ट्रेन सकाळी ६.५० मिनिटांनी सुटेल. बोरिवलीला ७.२३ वाजता, वसई रोडला ७.५० वाजता, भिवंडी रोडला ८.५० वाजता, पनवेलला ९.५५ वाजता, रोहा ११.१५ वाजता, वीर १२.०० वाजता, चिपळूणला १३.२५, रत्नागिरीला १५.३५, कणकवलीत १८.००, सिंधुदुर्ग १८.२०, सावंतवाडी रोड १९.०० वाजता थिविमला २०.००, करमाळीला २०.३० तर मडगावला २२.०० वाजता पोहोचेल. रोहा आणि रत्नागिरीत ट्रेन ५ मिनिट तर वसई रोडला २५ मिनिटं थांबेल.

# राज्यातील डाळिंबाचा गोडवा गुजरातवर भारी

## ■ आवक कमी झाल्याने दर वाढले

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**
पावसाळा सुरू झाला की बाजारात टपोऱ्या दाण्यांच्या डाळिंबाच्या राशी लागण्यास सुरुवात होते. अगदी रस्त्यांच्या कडेला डाळिंबाचे विक्रेते ढीग लावून डाळिंब विकताना दिसू लागतात. त्यापाठोपाठ टपोऱ्या डोळ्यांची सीताफळेही बाजारात सर्वांचे लक्ष वेधून घेऊ लागतात. मात्र यावर्षी पावसाच्या बिघडलेल्या वेळापत्रकाचा फटका या दोन्ही पावसाळी फळांना बसला आहे. त्यामुळे बाजारात या फळांची आवक कमी झाली असून दरही वाढले आहेत. महाराष्ट्रातून डाळिंब कमी येत असल्याने गुजरातवरूनही डाळिंब येण्यास सुरुवात झाली आहे. मात्र, गुजरातची ही डाळिंबे आतून सफेद असल्याने त्यांना उठाव नसल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

या फळांच्या रोपांना जेव्हा पाऊस हवा होता, तेव्हा तो पडला नाही, अन् जेव्हा पाऊस नको होता, तेव्हा जोरदार कोसळल्याने झाडांना लागलेली फुले मोठ्या प्रमाणात गळून गेली. परिणामी, उत्पादन कमी झाले. त्यामुळे बाजारात या दोन्ही फळांची आवक कमी होत आहे. यावर्षी यापुढेही आवक कमीच राहणार असल्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी वर्तवला आहे. त्याचाच परिणाम फळांच्या दरांवर पाहायला मिळत आहे.

बाजारात संगमनेर, पंढरपूर, सांगोला, सोलापूर, श्रीगोंदा, फलटण आणि जेजुरीमधून डाळिंबाची आवक होत असते. त्यानुसार आता डाळिंबाची आवक सुरू झाली आहे. मात्र ही आवक दरवर्षीप्रमाणे नाही. यावर्षी आवक अवघ्या ४० टक्क्यांवर आली आहे. हीच परिस्थिती सीताफळाच्या बाबतीतही आहे. सासवड आणि नगर, जुन्नरमधून सीताफळाची आवक सुरू झाली आहे. मात्र त्यांचेही प्रमाण कमी आहे. सध्या घाऊक बाजारातच डाळिंब १५० ते २०० रुपये किलो दराने मिळत आहेत. त्यामुळे किरकोळ बाजारात डाळिंबांचा दर २०० ते ३०० रुपये किलोवर पोहोचला आहे. तर, सीताफळाला १०० ते २०० रुपये किलोचा दर आहे.

# आगरदांडा बंदराला विकासाची प्रतीक्षा

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
सुमारे २७०० हजार कोटी रुपये खर्च करून श्रीवर्धन तालुक्यातील दिघी व मुरुड तालुक्यातील आगरदांडा याठिकाणी दोन मोठे बंदर विकसित करण्याचे काम चालू झालं. सरकारने त्यावेळेला बीओटी तत्त्वावरती हा प्रोजेक्ट विजय कलंत्री यांना चालवायला दिले होते. परंतु ९ वर्षात जेवढी कामे पाहिजे ती विजय कलंत्री यांच्याकडुन झाली नाही.त्यामुळे या प्रोजेक्टला ब्रेक लागला.

तीन वर्षांनी हे काम अदानी समुहाला देण्यात आले. आणि बंदराचे काम वेगाने सुरू करण्यात आले आहे. यापैकी दिघी येथे बंदर विकसित झाले असून या प्रकल्पाचा पहिला, दुसरा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला असून परंतु मुरुड तालुक्यातील आगरदांडा येथील बंदराच्या विकास झाला नसल्याने या आगरदांडा बंदराला वेग कधी येणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

गेली पंधरा वर्षांपासून आगरदांडा बंदर विकसित होत नसल्याने स्थानिकांना रोजगार मिळू शकला नाही. शेकडो तरुण रोजगाराच्या प्रतिक्षेत आहेत. बंदराच्या विकासापूर्वी या ठिकाणी मोठी रेलचेल दिसून येत होती. आगरदांडा बंदर सुरु न झाल्याने बेरोजगारीचा प्रश्न गंभीर बनला आहे.दिघी प्रमाणे आगरदांडा बंदर सुरू झाला तर स्थानिकांच्या बेरोजगारीचा प्रश्न सुटेल विविध उद्योगधंद्यांना चालना मिळाली असती. पोर्टला आवश्यक असणारा आगरदांडा ते इंदापूर हा चौपदरी रस्ता तयार झाला. आगरदांडा ते रोहा रेल्वेमार्गाला मंजुरी मिळाली तरी ही आगरदांडा बंदर विकसला वेग येताना दिसत नाही. रायगड जिल्ह्यातील दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र उभारणीवर शिक्कामोर्तब केले आहे. यासाठी कोट्यवधी रुपयांची निधीची तरतूद केली आहे. आगरदांडा बंदराकडे कानाडोळा न करता हे बंदर कसे विकसित होईल याकडे अदानी समुहाने लक्ष देणे गरजेचे आहे.

# शिंदे गटाच्या मंत्र्याच्या घशात नवी मुंबईचा भूखंड

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**
शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड यांच्या संस्थेला नवी मुंबईतील ५,६०० चौरस मीटरचा भूखंड देण्याचा निर्णय घेण्यात आला. सामाजिक कार्यासाठी भूखंडाची मागणी केल्यानंतर वर्षभरात वेगाने सूत्र हलविली गेली आणि भूखंड वितरीत झाला. मात्र या प्रक्रियेत अनेक नियमांचे उल्लंघन झाले असल्याचे आता समोर आले आहे.

मंत्री संजय राठोड यांच्या खासगी सचिवाने लिहिलेल्या पत्रावर सिडकोने भूखंड वितरीत केला. तसेच मंत्रिपदावर असलेल्या नेत्याच्याच संस्थेला भूखंड कसा काय दिला जाऊ शकतो? असाही प्रश्न उपस्थित झाला आहे. संजय राठोड यांनी मात्र हा भूखंड आपण परत देत असल्याचे म्हटले आहे. नोव्हेंबर २०२२ मध्ये ‘‘अखिल भारतीय बंजारा सेवा संघ’’ या संस्थेने बंजारा समाजासाठी जागा मिळावी, अशी मागणी केली.

या मागणीनुसार राज्य सरकारने नवी मुंबईतील सिडकोच्या ताब्यात असलेला ५,६०० चौरस मीटरचा भूखंड नोव्हेंबर २०२३ मध्ये ‘‘श्री संत रामराव महाराज चॅरिटेबल ट्रस्ट’’ला दिला. मंत्री संजय राठोड या संस्थेचे प्रमुख आहेत.मंत्री संजय राठोड म्हणाले, बंजारा समाजासाठी समाजकार्य करू इच्छित असलेली दुसरी कोणतीही संस्था पुढे आल्यास हा भूखंड आपण त्यांना देऊ. ही जमीन नफा कमविण्यासाठी नाही तर सामाजिक कार्यासाठी मागण्यात आलेली आहे, त्यामुळे यामध्ये मंत्री म्हणून आपले काही हितसंबंध नाहीत.

बंजारा समाजासाठी सामाजिक केंद्र उभारण्यास इच्छुक असलेल्या अनेक संस्थापैकीच आमचीही एक संस्था होती.जमीन वितरीत करताना संजय राठोड यांचे खासगी सचिव विशाल राठोड यांनी मंत्र्यांच्या लेटर हेडवर सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना पत्र लिहिल्यामुळे सत्तेचा गैरवापर आणि अनैतिक व्यवहार झाल्याचे आरोप होत आहेत. १६ जून २०२३ रोजी विशाल राठोड यांनी पहिले पत्र लिहिले होते. बंजारा समाजासाठी भूखंड निश्चित झाल्यानंतर तो श्री संत डॉ. रामराव महाराज चॅरिटेबल ट्रस्टच्या नावाने वितरीत करण्यात यावा, अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली होती.

## कोकणात जाण्यासाठी भाविक निघाले

# पुण्यातील गणेशभक्तांकडून गाड्यांचे बुकिंग

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**
मुंबई आणि पुणे येथे कामानिमित्त असलेले चाकरमानी गणेशोत्सवासाठी मोठ्या प्रमाणात कोकणाकडे जातात. पुण्यातून कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी खास करून एसटीकडून विशेष जादा गाड्यांचे नियोजन केले आहे. यामध्ये ग्रुप बुकिंग आणि आरक्षणाची सोय करून देण्यात आली आहे. त्यामुळे सोमवारपर्यंत गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांकडून २०० गाड्या बुकिंग करण्यात आल्या असून, यामध्ये १६० गाड्या आरक्षण, तर



६० गाड्या ग्रुप बुकिंग करण्यात आल्या आहेत, अशी माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली. गणेशोत्सव, शिमगा हे कोकणवासीयांचे आवडीचे सण. या सणाला पुणे, मुंबई व इतर ठिकाणी कामानिमित्त असलेले कोकणातील चाकरमानी गावी जातात. त्यामुळे एसटी, रेल्वे गाड्यांना प्रचंड गर्दी होत असते. या पार्श्वभूमीवर एसटी प्रशासनाकडून कोकणासाठी अतिरिक्त गाड्यांचे नियोजन करण्यात येते. यंदाही एसटीच्या पुणे विभागाकडून अतिरिक्त गाड्यांचे नियोजन केले आहे. या नियोजनानुसार सोडण्यात आलेल्या २०० अतिरिक्त गाड्या फुल्ल झाल्या असून, एसटीच्या आरक्षण सेवेला आणि ग्रुप बुकिंगला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.यंदा जोरदार आणि ढगफुटीसदृश पावसामुळे कोकणवासीयांचा गावी जाण्याचा रस्ता असलेल्या वरंधा घाटात दरडी कोसळून अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाकडून वरंधा घाट वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. यामुळे यंदा एसटीतून कोकणात जाणाऱ्या एसटी प्रवाशांचा प्रवास साताऱ्यामार्गे होणार आहे.

> **ज्या प्रवाशांना ग्रुप करून गावी जायचे असेल, त्यांनी आताच स्वारगेट किंवा शिवाजीनगर आगारात मागणी करावी. त्यांनाही बस उपलब्ध करून देण्यात येईल. - प्रमोद नेहुल, विभाग नियंत्रक, पुणे विभाग**

तरी ही प्रवाशांकडून यंदा एसटी आरक्षणास प्रतिसाद मिळत आहे.गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत २०० बस बुकिंग झाल्या आहेत.

# जेएनपीएतील सरोवरात विविध प्रजातींच्या पक्ष्यांची मांदियाळी

**। उरण । वार्ताहर ।**
जेएनपीए बंदर परिसरातील आधुनिक इको तंत्रज्ञानाचा वापर करीत येथील पाचही जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे. यामुळे जेएनपीए बंदर परिसराच्या सौंदर्यात भर पडली असून परिसरात येणाऱ्या विविध जातींच्या हजारो आकर्षक मुक्त पक्ष्यांचा संचारही वाढला आहे. मोकळ्या जागी अनेक जिवंत पाण्याचे झरे, पाणवठे, तलाव अस्तित्वात आहेत.

या अस्तित्वात असलेल्या प्रशासन भवनसमोरील खालच्या बाजूला जुना शेवा गावाच्या पायथ्याशी, या गावातच असलेल्या शिवमंदिर आणि प्लाझा पार्किंगच्या शेजारी असे एकूण पाच नैसर्गिक जलकुंभ, पाणवठे, तलाव, विहिरी, नैसर्गिक झरे आहेत. या नैसर्गिक ठिकाणी वर्षातील सर्वच ऋतूंमध्ये ओलावा, पाणी कायम असल्याने विविध प्रकारचे पक्षी, सूक्ष्मजीव, जलजिवांची रेलचेल असते.

लाल मुनिया, चिमणी, सुगरण, गुलाबी पिंच, कालशिर्ष भारीट, पर्वत कलर, चिरक, दयाळ, छोटा सातभाई, नर्तक, कोतवाल, सुतार, बैरागी, शेंदरी विष्फुलिफ, जेरडीनचा क्लोरॉप्सिस, पिपिट, करडा धोबी, चेस्टनट पोटाचा नटहॅच, फुलटोच्या गप्पीदास, राखी वटवट्या, शिंपी, कस्तुर, टकाचोर, राखी खाटीक, छोटा हिरवा राघू, तांबट,तांबडा होला, हरतालिका, नीलकंठ, खंड्या, भारद्वाज, सीगल आदी पक्षी येत आहेत.

निवडक

## विद्यार्थी सुरक्षेसाठी निवेदन

**म्हसळा :** श्री रविप्रभा सामाजिक संस्था रायगड यांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेसाठी ठोस पावले उचलण्याच्या दृष्टीने गटविकास अधिकारी एम. के. जाधव यांना निवेदन देण्यात आले. यावेळी गटशिक्षणाधिकारी रमेश चव्हाण,संस्थाप्रमुख रवींद्र लाड,सचिव संतोष उद्धरकर, खजिनदार सुशांत लाड,दत्ता लटके, समीर लांजेकर, गणेश वाजे, बाळा म्हात्रे, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे तालुका प्रमुख सुरेश कुडेकर उपस्थित होते.

## प्रकृती रिसॉर्टमध्ये वृक्षारोपण

**कोर्लई :** काशिद ग्रामपंचायत हद्दीतील प्रकृती रिसॉर्टचे मालक प्रभाकर शेट्टी व शामला शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकृती रिसॉर्टच्या टिमने सालाबादप्रमाणे यंदाही विविध प्रकारची झाडे लावण्यात येऊन वृक्षारोपण करण्यात आले. यंदाही प्रकृती रिसॉर्टमध्ये आपटा (कांचन), बांबू,बेल, रेडमाचिरा, बॉटल ब्रश, बिसमार्किया आदी लाखो रुपयांची विविध प्रकारची झाडे लावण्यात येऊन वृक्षारोपण करण्यात येत आहे.त्याचा शुभारंभ नुकताच करण्यात आला.

## मुकादम तंटामुक्त अध्यक्षपदी

**चणेरा:** ग्रुप ग्रामपंचायत खैरेखुर्दच्या महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी शहानवाज युनुस मुकादम यांची बिनविरोध निवड झाली. शहानवाज मुकादम हे सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आणि पर्यावरण क्षेत्रात सक्रिय आहेत. गोरगरिबांच्या न्याय व हक्कांसाठी सदैव तत्पर असणे हे त्यांच्या कामाची ओळख आहे. त्यांच्या संबंधित प्रशासन आणि पोलीस विभागाशी असलेल्या चांगल्या संबधांचा निश्चितच परिसरातील नागरिकांना फायदा होणार आहे.

## शालोपयोगी वस्तूंचे वाटप

**रसायनी :** खालापूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना विश्वनिकेतन अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्टुडन्ट असोसिएशन ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग आणि सनाया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.यात विद्यार्थ्यांना वह्या, चित्रकला वह्या, कलर्स, पेन स्कूल बॅग व खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी विश्वनिकेतन अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य आदी उपस्थित होते.

## अध्यक्षपदी पांडुरंग नागावकर

**खांब :** तळवली तर्फे अष्टमी ग्रामपंचायतीच्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती अध्यक्षपदी पांडुरंग नागावकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यावेळी सरपंच रविंद्र मरवडे, उपसरपंच संदीप महाडिक,पोलीस पाटील गणेश महाडिक,माजी सपंच वसंत मरवडे, सदस्य दयाराम मरवडे, निलम वाळंज, सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ कोस्तेकर, मधुकर पवार, सुरेश वाघमारे, आविष्कार मरवडे, मोनिका महाडिक, ग्रामसेविका पिंपळकर, सुभाष बामणे आदी उपस्थित होते.

# अपघाताविना खणला बोगदा




हा बोगदा खणण्यासाठी स्वित्झर्लँड येथील बनावटीच्या यंत्रसाहित्याची जोडणी करुन बुमर ड्रील जम्बो यंत्राच्या सहाय्याने दोन्ही बोगदे खणण्याचे काम सुरु आहे. यंत्रासोबत चालक, ऑपरेटर, मजूर, मशीन सहाय्यक असे ३०० मजूर याच ठिकाणी दिवसरात्र दोन पाळ्यांमध्ये काम करतात. अजूनही दुसऱ्या बोगद्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे.

**4.16** किलोमीटर लांबीचे दोन दुहेरी बोगदे

**9.98** किलोमीटरचे बांधकाम वेगात

**। पनवेल । वार्ताहर ।**

वडोदरा मुंबई या महामार्गाच्या बांधकामाचा शेवटच्या पॅकेजचे ९.९८ किलोमीटर लांबीचे बांधकाम जोरदार सुरु असून या महामार्गात ४.१६ किलोमीटर लांबीचे दोन दुहेरी बोगदे खणले जात आहे. यातील एक बोगदा खणण्याचे काम अवघ्या १५ महिन्यांत पूर्ण झाल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी समाजमाध्यमांवर दिली. ज्या कामाला २४ महिने लागतात तेच काम ९ महिन्यांपूर्वी झाले आहे. यासाठी ३०० कामगार, २० अभियंते दिवसरात्र एक करुन करत झटत आहेत. दुसऱ्या बोगद्याचे काम ऑक्टोबर महिन्यात पूर्ण होईल. देशातील रस्ते बांधकामातील हा सर्वात लांबीचा बोगदा असून अपघाताविना हा बोगदा झाले याचे समाधान या कामगार व अधिकारी व्यक्त करीत आहेत.

वडोदरा मुंबई राष्ट्रीय महामार्गामुळे १५ मिनिटांत पनवेलकरांना बदलापूरला जात येईल. तसेच जेएनपीटी बंदरातील कंटेनर वाहतूक यापूढे बदलापूर मार्गे समृद्धी महामार्ग आणि दिल्ली वडोदरा महामार्गाने करता येणार असल्याने पनवेल, तळोजा, कल्याण येथील वाहतुकीचा निम्मा ताण कमी होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने वडोदरा मुंबई महामार्गाचे आरेखन केले आहे. भोज ते मोरबे या शेवटच्या पॅकेजचे १४०० कोटी रुपयांचे काम इरकॉन इंटरनॅशनल आणि जे. कुमार इन्फ्रा. प्रोजेक्ट या कंपन्या करत आहेत. शेवटच्या पॅकेजचे बोगद्यासह महामार्ग बांधण्याचे काम ४५ टक्के पूर्ण झाले आहे. दुहेरी बोगद्यापैकी एका बोगद्याचे काम पूर्ण खणून झाले असून उर्वरीत दुसऱ्या बोगद्याचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. या दोन्ही बोगद्याची मध्यभागाची उंची १३ मीटर आणि रुंदी २२ मीटर आहेत. ग्रीन फील्ड बोगद्यात वाहने मध्ये प्रवेश करु शकणार नाहीत. या पद्धतीने बोगद्यांची रचना करण्यात आली आहे. हे बोगदे खणण्यासाठी माथेरानच्या डोंगररांगामध्ये डोंगराला दिवसाला चार वेळा सुरूंग स्फोट घडवून आणले जात होते. स्फोटानंतर डोंगराला भेदून त्यातील ३ ते ४ मीटर लांबीतून निघणारा राडारोडा काढून त्यानंतर बोगद्याचे पुढील कामाची सुरुवात केली जात होती. इरकॉन कंपनीचे अभियंत्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे सर्व सुरक्षेचे नियम पाळून हे काम ठरलेल्या कालावधीपेक्षा लवकर कामगार व यंत्रणा करु शकलो याचे समाधान वाटते. स्फोटापूर्वी काम करताना परिसरात वन्यजीव दिसण्याच्या घटना घडल्या होत्या. मात्र स्फोटाच्या आवाजानंतर वन्यजीव आढळले नाही. जेथे काम सुरु आहे त्यापासून काही अंतरावर मजूरांचे राहणे व जेवणाची सोय कंपनीने केल्याने मजूरांचा वाहतूक खर्च व वेळेची बचत झाली. अनेक अभियंत्यांनी याच परिसरात वास्तव्य करण्याची तयारी दर्शविल्याने बोगदा यशस्वीपणे खोदता आला.

# हरकतींसाठी महिन्याची मुदत द्या

**पनवेल प्रारूप आराखड्याबाबत शेकापची महापालिकेकडे मागणी**

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल महापालिकेने ८ ऑगस्टला जाहीर केलेल्या प्रारूप विकास आराखड्यावर हरकती आणि सूचना देण्यासाठी ७ सप्टेंबरची अंतिम मुदत संपण्यापूर्वीच आणखी महिनाभराची मुदतवाढ द्यावी, अशी मागणी भारतीय शेतकरी कामगार पक्षाने केली आहे. या मागणीचे लेखी निवेदन शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांना दिले आहे.

पनवेल महापालिका क्षेत्राची सद्या:स्थितीत अंदाजित लोकसंख्या नऊ लाखांवर असली तरी पनवेल महापालिकेचा कारभार २००१ सालच्या भारतीय जनगणेनुसार चालतो. २००१ साली पालिका क्षेत्रात सध्या समावेश झालेली २९ गावे, पनवेल शहर, कळंबोली, नवीन पनवेल, खांदेश्वर, कामोठे, खारघर व तळोजा या उपनगरांची लोकसंख्या पाच लाखांच्या आत




असल्याचे पालिकेच्या प्रत्येक सरकारी नियोजनात दर्शविते.

नगरविकास विभागाच्या नियमानुसार ज्या महापालिकांची लोकसंख्या ५ लाखांच्या आत आहे अशा महापालिकेचा प्रारूप विकास आराखड्यावर हरकती व सूचनांचा कालावधी नगरविकास विभागाने ३० दिवसांचा दर्शविला आहे. त्यामुळे शेकापने केलेली हरकती करण्यासाठी मुदतवाढीची मागणी किती टिकेल याविषयी साशंकता आहे. तसेच शेकापने प्रारूप विकास आराखडा सामान्य शेतकऱ्यांना समजण्यासाठी त्या प्रारूप आराखड्यातील सांकेतिक चिन्हे व इतर बाबी मराठी भाषेतून भाषांतरित करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी केली आहे.

> पालिकेच्या संकेतस्थळावर आजच उपलब्ध असलेल्या प्रारूप विकास आराखड्यातील सांकेतिक चिन्हे व त्या संबंधित दिशादर्शके मराठी भाषेत करण्यासाठी सूचना दिल्या असून ते बदल आजच संकेतस्थळावर नागरिकांना झालेले दिसतील. हरकत व सूचनांसाठी मुदतवाढ देणे ही बाब महापालिका अधिनियमात नसल्याने त्या बाबतीत निर्णय पालिका स्तरावर होऊ शकत नाही. पनवेल पालिकेने विविध सेलच्या माध्यमातून प्रारूप विकास आराखडा नागरिकांसाठी उपलब्ध केला आहे. पालिकेने तेथे अधिकारी नेमले आहेत. नागरिकांनी त्यांच्या हरकती व सूचना ७ सप्टेंबर पूर्व लेखी स्वरुपात नोंदवावे.
>
> –मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापालिका

# विद्यार्थ्यांनी कामाप्रती निष्ठा ठेवावी : विवेक मुगळेकर




**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय श्रीवर्धन व विनर्स जॉय ऑफ गिविंग या सेवाभावी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने मेडिटेशन व करिअरच्या संधी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी श्रीवर्धन पोलीस स्टेशनचे उपविभागीय अधिकारी विवेक मुगळेकर, संस्थेचे प्रमुख राहुल माने, राकेश म्हात्रे, रीमा माने व अन्य सदस्य उपस्थित होते.

वाढता हिंसाचार, व्याभिचार, अशांतता, लैंगिक शोषण, जीवनाकडे पाहण्याची नकारात्मक दृष्टी व वाढता चंगळवाद यामुळे जीवनाची नैतिक मूल्यांचे अवमूल्यन होत आहे अशी खंत प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांनी व्यक्त केली.

विद्यार्थी जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेडिटेशनशिवाय पर्याय नाही त्यासाठी या विद्यार्थी दशेतच करिअरच्या संधी व अचूक निर्णय घेतले पाहिजेत अशी भावना राहुल माने यांनी व्यक्त केली.

श्रीवर्धन पोलीस उपविभागाचे नवनियुक्त उपविभागीय अधिकारी विवेक मुगळेकर यांना सन २०१७ मध्ये राष्ट्रपती शौर्य पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी करिअरच्या अचूक संधी निवडून आपल्या कामाची निष्ठा व प्रामाणिकपणा ठेवून अध्ययन व अध्यापन केले पाहिजे, तर भावी जीवनाची वाटचाल सुखकर होईल असे विचार विवेक मुगळेकर यांनी मांडले.

श्रीवर्धन तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार प्रथमेश भुरके यांनीही कठोर परिश्रमाशिवाय यश संपादन करता येत नाही. त्यासाठी आपण कामावर प्रामाणिकपणे प्रेम व निष्ठा ठेवावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राकेश म्हात्रे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवज्योत जावळेकर यांनी केले.





# एक धाव होमगार्डसाठी...

● जिल्हा गृह रक्षक दलासाठी एकूण ३५० जागांसाठी भरती प्रक्रिया नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलमध्ये घेण्यात आली. यावेळी उमेदवारांची शारीरिक चाचणी घेण्यात आली. पथकनिहाय २८४ पुरुष आणि ६६ महिलांसाठी भरती होत असून यासाठी ४०९८ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. पुरुषांसाठी १६०० मीटर धावणे, गोळफेक तर महिलांसाठी ८०० मीटर धावणे आणि गोळफेक चाचणी घेण्यात आली. (छायाचित्र : समीर मालोदे)

# माथेरानच्या जंगलात आढळले मृत जंगली डुक्कर

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानच्या घनदाट जंगलात जंगली डुक्कर मृत अवस्थेत आढळले असून एका बंगल्याच्या कुंपणा शेजारी जंगली डुक्कर मृत अवस्थेत सापडल्याने जंगली प्राण्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

माथेरान पर्यटनस्थळाच्या डोंगरमाथ्यावर ३००हेक्टर टापुमध्ये घनदाट जंगल आहे.उंच घनदाट वृक्षराजीने माथेरान हिरवेगार दिसत असते.जंगलामुळे जंगली प्राणी सुद्धा मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामध्ये जंगली डुक्करांचे कळप सुद्धा याठिकाणी पाहणीत आले आहेत. दुपारच्या सुमारास एक जंगली डुक्कर मृत अवस्थेत आढळून आले.ही माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांना समजताच वनरक्षक,वनमजूर हे सर्व घटनास्थळी हजर झाले.त्यांनी पशुधन अधिकाऱ्यांना बोलावून त्याचे शवविच्छेदन करण्यात आले.कशामुळे या जंगली डुक्कराला प्राण गमवावे लागले हे समजू शकले नाही.

> माथेरानमध्ये २५६ एमपी प्लॉटस आहेत.यातील काही बंगल्याना कुंपणे घातली आहेत. कुठे दगडाचे तर कुठे तारांचे कुंपण आहेत. हे बंगले काही भागात जवळजवळ असल्याने त्याठिकाणी कुंपण दिसत आहेत. यामुळे जंगली प्राण्यांना वावरण्यास अडचणी निर्माण होताना दिसत आहे.त्यामुळे ही बंगल्याची कुंपणे जंगली प्राण्यांच्या जीवावर उठत आहेत अशी भीती व्यक्त आहे.

## माजी आमदार बाळाराम पाटील यांना

# ‘उत्कृष्ट भाषण पुरस्कार जाहीर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे सन २०२०/२०२१ करिता महाराष्ट्र विधानपरिषद उत्कृष्ट भाषण पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा ०३सप्टेंबर रोजी दुपारी ३.३०वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन मुंबई या ठिकाणी महामहिम राष्ट्रपती यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्र विधिमंडळाचे पिठासीन अधिकारी यांच्या निर्देशानुसार राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे महाराष्ट्र विधीमंडळाच्या माजी सदस्यांना २०१८-२०१९, २०१९-२०२०, २०२०-२०२१, २०२१-२०२२, २०२२-२०२३ आणि २०२३-२०२४या कालावधीसाठी देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट भाषण याची घोषणा केली असून त्याचे वितरण सोहळा ०३सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ३.३०वाजता मध्यवर्ती सभागृह, विधानभवन मुंबई या ठिकाणी महामहिम राष्ट्रपती यांच्या हस्ते होणार आहे.

# बल्लाळेश्वर मंदिराकडे जाणारा रस्ता खड्ड्यात



**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

पाली हे अष्टविनायकाचे स्थान असलेल्या बल्लाळेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची खड्ड्यांमुळे बिकट अवस्था झाली आहे. त्यामुळे नागरिक नगरपंचायत लोकप्रतिनिधीच्या विरोधात संताप व्यक्त करत आहेत. गणपती सण जवळ आला असल्याने ग्रामीण भागाकडे जाणारा मुख्य रस्ता तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.

हा रस्ता तातडीने व्हावा अशी मागणी पालीतील सर्व स्तरातून होत आहे. आठ दिवसांवर गणपती सण आल्यामुळे मुंबईतील चाकरमानी गणपती सणासाठी आपापल्या खेड्यापाड्यात याच रस्त्याने येतात. पाली हे शहर अष्टविनायकाचे स्थान असल्याने या ठिकाणी रेलचेल असते. सद्यस्थितीत सब रजिस्टर कार्यालय ते गणेश मंदिरापर्यंतच्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. या रस्त्याची भल्या मोठ्या खड्ड्यांनी अक्षरशः चाळण झाली आहे. गणपती मंदिराकडे जाणारा रस्त्यावरूनही प्रवास त्रासदायक होतो. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह पर्यटकदेखील संताप व्यक्त करत आहेत. खड्ड्यांमुळे वाहन चालकांना कसरत करावी लागत आहे.

> आम्ही पाली नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी यांना आज निवेदन दिले आहे. त्या निवेदनात आम्ही म्हटले आहे की गणपती सणाच्या अगोदर नगरपंचायतीने निवेदनाची दखल घेऊन तात्काळ खड्डे बुजवावे अन्यथा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आंदोलन करेल.
>
> – विदेश आचार्य,पाली शहर प्रमुख (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष)

सदर निवेदन देण्यासाठी सुधागड तालुकाप्रमुख दिनेश चिले, विनेश सितापराव, राजेंद्र राऊत, पाली शहर प्रमुख विदेश आचार्य,विभाग प्रमुख प्रवीण ओमळे, एकनाथ हलदे, प्रशांत शितोळे, विनित क्षीरसागर, सुरज गुप्ता यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● **वाडगाव येथे कॉटेज** सांभाळण्याकरिता व्यक्ती पाहिजे. संपर्क-९७६२७७७९७५.

● व्यावसायिक गाळा भाड्याने देणे आहे कारपेट एरिया 750 Sq Foot संपर्क ९४२२५९४०३३/८३०८३२१६२६ ठिकाण - मिरची गल्ली अलिबाग.

● Tata Heritage motors pvt. Ltd. (Alibag Showroom) Vaccancy for Below mention position 1) Sales manager-1, 2) Service manager-1, 3) Team Leader-1, 4) Custmor Adviser-5.
Email- hr@heritagemotors.in
Contact No. 9324517224

● **ऑनलाईन प्रवेश सुरु आहे.** अंगणवाडी शिक्षिका, सुपरवाझर, समाजसेवक, पत्रकार इत्यादी कोर्स प्रवेश देणे सुरु आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा ९०२९२९४८३८/९५१८५६५५१६

● **वरसोली, रायगड** आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९

● **किहीम, रायगड** समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९

● **चौल, रायगड** मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९

● **संकुल सहकारी गृहनिर्माण संस्था,** पिंपळभाट-अलिबाग यांना सेक्युरिटीची आवश्यकता आहे. तरी इच्छुक सेक्युरिटी एजन्सीजनी कोटेशन पाठवावे. संपर्क : शरद भोईर ९०२८५७८०३०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## आई करंजाई महिला नाच मंडळास नृत्य साहित्य लोकार्पण

# शेकापच करणार विकास–चित्रलेखा पाटील

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

आपली संस्कृती हा आपला आत्मा आहे. गावोगावी महिला ही संस्कृती जपतात. महिलांना कलाक्षेत्रातील लागणारी कोणतीही गोष्ट मी कधी नाही म्हणत नाही. माणुसकी हाच आमचा धर्म आहे आणि त्याचे पालन करुनच मी पुढे जाईन. गावातील विकासकामे करायची असतील तर शेकापक्षाशिवाय पर्याय नाही असे चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई म्हणाल्या.



शेडसई येथील आई करंजाई महिला नाच मंडळास नृत्यासाठी मशिन, स्पिकर, माईक व लागणारे ढोलकी, झांज, स्पिकर इतर साहित्य शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी स्वखर्चाने दिले. याआधी गावात मोफत चष्मे, विद्यार्थ्यांनींना सायकल वाटप त्याप्रमाणे गरजूंना आर्थिक मदत चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताईंनी केल्याने ग्रामस्थांनी आभार मानले. काही कारणाने आम्ही बांधलेल्या पीएनपी नाट्यगृह आगीच्या भक्ष्यस्थानी आले, ते पुन्हा बांधून तयार झाल्यावर तुम्हाला नाचण्यासाठी आवर्जून आमंत्रण देणार आहे, असे चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई म्हणाल्या

यावेळी सरपंच कल्याणी मढवी, उपसरपंच राजेश्री पाटील, मजदूर फेडरेशनचे अध्यक्ष हेमंत ठाकूर, विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन गोपीनाथ गंभे, उपचेअरमन विकास भायतांडेल, कार्यालयीन चिटणीस संदेश विचारे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक विनायक, युवक संघटना सचिव अमोल शिंगरे, विलास म्हात्रे, आत्माराम कासारे, संतोष दिवकर, अरुणा तांबडे, जयराम गायक, तानाजी म्हात्रे, काशिनाथ मांडलेकर, कम लाकर पाष्टे, नरेश खराडे, परशुराम बोले, हिराजी कांडणेकर, हेमंत शिंगरे आदी उपस्थित होते.

# गृहप्रकल्पांचे सांडपाणी अंबा नदीत

**■ नागरिकांच्या आरोग्यास धोका**



**। पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील परळी ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या अंबा नदीलगत असणाऱ्या झेन काँटी, निर्वाणा या गृहप्रकल्पाच्या इमारतीच्या सांडपाण्यासह इमारतींच्या सदनिकांमधील ओला-सुका कचरा, जुने झालेले मोडकळीस आलेले फर्निचर थेट अंबा नदीमध्ये टाकले जात असल्याचे येथील नागरिकांनी निदर्शनास आणून दिले. यामुळे अंबा नदी मोठ्या प्रमाणात प्रदूषित होत आहे.

अंबा नदीलगत आमनोली, कोलतरे, दहीगाव आदी गावांच्या नळपाणीपुरवठा योजना असून, सदर पाणी पिण्यासाठी वापरले जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अंबा नदीच्या या दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याने नागरिकांमध्ये संतापची लाट पसरलेली आहे. या गंभीर बाबीकडे परळी ग्रामपंचायतीने तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाने तात्काळ लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

> **सदर गृहप्रकल्पाबाबत तेथील आजूबाजूच्या नागरिकांच्या ग्रामपंचायतीमध्ये अनेकदा तक्रारी आल्या आहेत. त्या तक्रारीची दखल घेत आम्ही तात्काळ प्रकल्प विकासकाला नोटीस काढणार आहोत.**
> **– साक्षी देसाई, सरपंच, परळी ग्रामपंचायत**

> **झेन कौटी आणि निर्वाणा या दोन गृहप्रकल्पातील सदनिकाधारक हे मुंबई, पुणे येथील असून, ते शनिवार–रविवार सुट्टीच्या दिवशी मौजमजा करण्यासाठी येतात. त्यावेळी त्यांनी केलेला रूममधील ओला व सुका कचरा तसेच दारूच्या बाटल्या केअरटेकर डस्टबिनमध्ये भरून ठेवतात. मात्र, तो सर्व कचरा अंबा नदीमध्ये फेकला जातो, याकडे संबंधित विभागाने लक्ष द्यावे.– केतन देसाई, स्थानिक नागरिक, देसाईपाडा**

> **झेन काँटी आणि निर्वाणा या दोन गृहप्रकल्पपात आठ आणि पाच मजल्याच्या जवळपास २५ ते ३० इमारती आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणातील गृहप्रकल्पासाठी संबंधित विभागाकडून काही अटी–शर्ती घातलेल्या असतात. यामध्ये इमारतीमधील सांडपाणी तसेच संडास बाथरूमचे सांडपाणी कोणत्याही नैसर्गिक स्त्रोतात न सोडता तेथेच त्याची व्यवस्था करणे किंवा ईटीपी प्लांट टाकणे अनिवार्य असते; परंतु इथे काही केलेले दिसत नाही. तरी, या बाबीकडे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे.**
> **– धर्मेंद्र आंदेकर, सदस्य, ग्रामपंचायत परळी**

# ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबीर

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमधील बीजे रुग्णालयामध्ये येथील ज्येष्ठ नागरिकांकरिता आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये माथेरानमधील अनेक नागरिकांनी आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला.

माथेरानमध्येवैद्यकीयसुविधांच्या मर्यादेमुळे अनेकांना उपचारासाठी माथेरानबाहेर जावे लागत असते. ही बाब लक्षात घेत ज्येष्ठ नागरिक संघटनेने त्यांच्यासाठी येथील नगरपालिका रुग्णालयामध्ये आरोग्य तपासणी मोफत इसीजी रक्त तपासणी व रक्तगट तपासणी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले होते. हे शिबीर आयोजित करण्याकरिता माथेरानचे मुख्याधिकारी राहुल इंगळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. रूपाली मिसाळ, डॉ. ऋषिकेश केंद्रे व वैद्यकीय कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसव्दारे सुचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली श्री. गंगाराम देहू बदे यांचे मालकीची मिळकत आमचे अशिल श्री. नागराज अधिराघवराव नल्लू यांनी कायम खरेदी खतामार्फत विकत घेण्याचे ठरविले आहे, तरी सदर मिळकती संदर्भात कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक इत्यादी यांना गहाण, दान, बक्षीस, किंवा लीन किंवा इतर कोणताही बोजा किंवा इतर कोणताही हक्क, अधिकार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर योग्य त्या पुराव्यानीशी संपर्क साधावा व लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल निम्न उल्लेखित मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट**

तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, दुय्यम निबंधक कर्जत, मांडवणे ग्रामपंचायत हद्दीतील मौजे मांडवणे, सर्व्हे क्रमांक २०, हिस्सा क्रमांक २/अ/१, क्षेत्रफळ 0हे-३१आर-00 प्रति पैकी विकत देण्यात येणारे क्षेत्र 0हे-३१आर-00 प्रति, आकार ०.१४ रू. पैसे, भोगवटादार वर्ग क्रमांक २ ची जमीन मिळकत.

**कुमारी सुप्रिया शशिकांत विचारे,**
कायदेशीर सल्लागार,
U-70 अक्षर बिझनेस पार्क
सेक्टर १९f,
वाशी-तुर्भे रोड नवी मुंबई ४००७०३
मोबाईल नंबर ९१६७०८२६०७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसव्दारे सुचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली श्री. संतोष उंदीर तांबोळी यांचे मालकीची मिळकत आमचे अशिल श्री. नागराज अधिराघवराव नल्लू यांनी कायम खरेदी खतामार्फत विकत घेण्याचे ठरविले आहे, तरी सदर मिळकती संदर्भात कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक इत्यादी यांना गहाण, दान, बक्षीस, किंवा लीन किंवा इतर कोणताही बोजा किंवा इतर कोणताही हक्क, अधिकार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर योग्य त्या पुराव्यानीशी संपर्क साधावा व लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल निम्न उल्लेखित मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट**

तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, दुय्यम निबंधक कर्जत, कडाव ग्रामपंचायत हद्दीतील मौजे कडाव, सर्व्हे क्रमांक १८, हिस्सा क्रमांक ३अ, क्षेत्रफळ 0हे-५७आर-५० प्रति पैकी विकत देण्यात येणारे क्षेत्र 0हे-५७आर-५० प्रति, आकार ०.४७ रू. पैसे, भोगवटादार वर्ग क्रमांक १ ची जमीन मिळकत व बिनशेती सर्व्हे क्रमांक १८, हिस्सा क्रमांक १, क्षेत्रफळ ७६.००.०० आर.चौ.मी. पैकी विकत देण्यात येणारे क्षेत्र ७६.००.०० आर.चौ.मी, आकार ७६०.०० रु.पैसे, भोगवटादार वर्ग क्रमांक १ ची जमीन मिळकत.

**कुमारी सुप्रिया शशिकांत विचारे,**
कायदेशीर सल्लागार,
U-70 अक्षर बिझनेस पार्क
सेक्टर १९f,
वाशी-तुर्भे रोड नवी मुंबई ४००७०३
मोबाईल नंबर ९१६७०८२६०७



# मुरूड समुद्रकिनारा मद्यपींचा अड्डा

**। मुरूड शहर । वार्ताहर ।**

पर्यटन विकासाच्या दृष्टिकोनातून शासनातर्फे करोडो रुपये खर्चून मुरूड जंजिरा समुद्रकिनाऱ्यावर सुशोभिकरण सुरू असल्याने नागरिक, पर्यटक सुखावले आहेत. मुरूड समुद्रकिनारी निवांत हवेशीर बसून सूर्यास्त, खळाळत्या लाटा आणि परिसराचे दर्शन घेण्यासाठी सायंकाळी मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक आणि पर्यटक येत आहेत. परंतु, या ठिकाणी अद्याप कोणतीही सुरक्षितता नसल्याने रात्रीच्यावेळी मद्यपींचा अड्डा बनतोय की काय, असे वाटायला लागले आहे.

मुरूड समुद्रकिनारी सुशोभिकरण काम अगदी अंतिम टप्प्यावर असून, नागरिक आणि पर्यकांसाठी निवांत गोलाकार बेंचची सुव्यवस्था करण्यात आली आहे. सायंकाळी अनेक ज्येष्ठ नागरिक आणि पर्यटक शतपावली करीत येथे विसावत असतात. थंड वाहणारी हवा आणि प्रदूषणमुक्त हवामान यामुळे मनाला खूप समाधान वाटते. परंतु, नागरिकांना बसण्यासाठी तयार केलेल्या गोलाकार बेंचचा फायदा रात्रीच्या अंधारात दारू पिण्यासाठी काही मोकाट मद्यपी घेत आहेत, असे अनेकांना दिसून आले आहे. काही मद्यपी मंडळी रात्री ९ वाजता अंधारात येथे येऊन थंडगार हवा अंगावर घेत दारूचे पेग रिचवत आहेत. हा प्रकार सहजासहजी लक्षात येत नाही. सर्व सोपस्कार आटोपले की हेच मद्यपी याच ठिकाणी दारू पिऊन बिअरच्या आणि व्हिस्कीच्या बाटल्या चौथऱ्यावर सोडून निघून जातात, असे आढळून आले आहे. असा प्रकार रोखण्यासाठी प्रशासनाकडून कोणतीही कडक उपाययोजना केलेली नसल्याने असे प्रकार वाढतील, अशी भीती व्यक्त होत आहे. मुरुडच्या सुंदर समुद्रकिनाऱ्यावर असा निर्लज्ज प्रकार रोखण्यासाठी आतापासून निर्बंध राखणे अत्यंत गरजेचे आहे. तरच येथील सुंदरता कायम राहील, अशी चर्चा मुरूडमध्ये ऐकायला मिळत आहे.

# गणेशमूर्तींचे काम अंतिम टप्प्यात

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

सध्या गणेशोत्सव अगदी तोंडावर आल्याने गणेशाच्या मूर्ती बनवणाऱ्या कारखान्यांमध्ये गणेशमूर्तींवर रंगकामाला सुरुवात झाली असून, कारागिरांची लगबग सुरू झाली आहे. वेगवेगळ्या आकाराच्या वेगवेगळ्या रंगांनी रंगवलेल्या गणेशमूर्ती सध्या कारखान्यांमध्ये तयार होताना पहावयास मिळत आहेत.

येत्या ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरूवात होत आहे. महाराष्ट्राचा सांस्कृतिक सण म्हणून गणेशोत्सवाकडे पाहिले जाते. अगदी अर्धा फुटापासुन ते १० फुटांपर्यंतच्या मूर्ती गणेशोत्सवामध्ये पहावयास मिळतात. ग्रामीण भागातही अनेक कारागीर बनवत असल्याचे दिसुन येते. गणेशमूर्ती तयार झाल्या असून, मूर्तींवर रंगकाम करण्याचे काम वेगात सूरू आहे. गणेशोत्सवात आकर्षक गणेश मूर्तीला मोठ्या प्रमाणावर मागणी असते.



## SRM E –TENDER NOTICE (IInd Call)

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/IInd Call Tender No.36/2024-25 Dtd.02.09.2024 No.7000033087 | **Sub:-IInd Call** for SRM E-Tender for providing outsources skilled manpower at various locations under EHV (O&M Dn. Mahad for the period 01.09.2024 to 31.03.2025. | **Rs.**9,19,185/- **(Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs.9192/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST.
Bid submission is from 02.09.2024 @ 00:00 hrs to 08.09.2024 @23:59 Hrs for above tender
for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL
**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

## जाहीर सूचना

यान्द्वारे जनतेला मोठ्या प्रमाणात **सूचना** देण्यात येत आहे की **श्री मकरंद सुरेश नार्वेकर** (“**मालक १**”) यांनी आमच्या अशीलांना **पहीला परिशिष्टामध्ये** वर्णन केल्याप्रमाणे **गाव सोगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**, महाराष्ट्र येथे चार जमिनी, शेजारच्या जमिनीचा भाग असलेल्या खाजगी रस्त्यांवरील निरंतर अधीकारासह (एकत्रितपणे “**मालमत्ता १**”), सर्व दावे, मागण्या आणि अडथळयांपासून मुक्त, स्पष्ट आणि विक्रीयोग्य मालकी हक्कासह विकण्यास सहमती दर्शविली आहे.

**पुढील सूचना** याद्वारे जनतेला मोठ्या प्रमाणात **सूचना** देण्यात येत आहे की **श्रीमती सरोजिनी राहुल नार्वेकर** (“**मालक २**”) यांनी आमच्या अशीलांना **दुसऱ्या परिशिष्टामध्ये** वर्णन केल्याप्रमाणे **गाव सोगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**, महाराष्ट्र येथे तीन जमिनी, शेजारच्या जमिनीचा भाग असलेल्या खाजगी रस्त्यांवरील निरंतर अधीकारासह (एकत्रितपणे “**मालमत्ता २**”), सर्व दावे, मागण्या आणि अडथळयांपासून मुक्त, स्पष्ट आणि विक्रीयोग्य मालकी हक्कासह विकण्यास सहमती दर्शविली आहे.

मालमत्ता १ आणि मालमत्ता २ यापुढे एकत्रितपणे “**मालमत्ता**” म्हणून संबोधले जातील आणि मालक १ आणि मालक २ यापुढे एकत्रितपणे “**मालक**” म्हणून संबोधले जातील.

सर्व किंवा कोणतीही व्यक्ति/संस्था, हिंदू अविभक्त कुटुंब, कंपनी, बँक(का), वित्तीय संस्था(थे), नॉन-बँकिंग वित्तीय संस्था(थे), फर्म, व्यक्तींचा समूह किंवा व्यक्तिंची संघटना अंतर्भूत असो किंवा नसो, सावकार आणि / किंवा कर्जदाराच्या सदर मालमत्ता किंवा त्याचा कोणताही भाग संबंधी कोणताही हिस्सा, अधिकार, मालकी हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/ किंवा मागणी असलेले विक्री, देवाण घेवाण, बेचनपत्र, गहाण, ताबा, भेट, विकास हक्क, फलोअर स्पेस इंडेकस, ताबा, भाडेकरार, उप-भाडेकरार, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, लीव्ह ॲण्ड लायसन्स, धारणाधिकार, देखभाल, विश्वस्त संस्था, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, वापर, व्यवसाय, राईट ऑफ वे किंवा इतर धारणाधिकार, खटला, कोणत्याही न्यायालय किंवा न्यायाधिकरणाचा हुकूम किंवा आदेश किंवा अन्यथा ज्या कोणत्याही प्रकारे असेल त्यांनी या द्वारे कृपया लेखी स्वरुपात त्याची सूचना सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासोबत निम्नस्वाक्षरीकारांना सिरिल अमरचंद मंगलदास, पेनिन्सुला चेंबर्स, पेनिन्सुला कॉर्पोरेट पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०००१३, भारत, येथे या सूचना प्रसिध्दीच्या तारीखेपासून **१४ (चौदा)** दिवसांच्या आत सूचित करावे अशी विनंती केली जाते त्यात अयशस्वी झाल्यास अशा कोणतेही व्यक्ति किंवा व्यक्तिंचा कोणतेही दावा, मागणी, हिस्सा, अधिकार, मालकी हक्क आणि हितसंबंध जर कोणतेही असेल तर ते माफ केले गेले आहे आणि/ किंवा सोडले गेले आहे असे मानले जाईल आणि मालमत्ता १ वर मालक १ चे मालकी हक्क आणि मालमत्ता २ वर मालक २ चे मालकी हक्क स्पष्ट आणि विक्रीयोग्य आहे आणि सर्व दावे, मांगण्या आणि कोणत्याही अडथळापासून मुक्त आहे असे मानले जाईल आणि आमचे अशील त्यानूसार मालकांकडून मालमत्ता खरेदी करण्यास पुढे जातील.

**पहिल्या परिशिष्ट**
**(मालमत्ता १ चे वर्णन)**

**(१)** सर्वे क्र. १२७/१/४ मोजमाप ४,०२३ चौरस मीटर किंवा सुमारे तेवढच गाव सोगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित आणि असलेल्या मोकळ्या शेतजमिनीचे सर्व तुकडे;
**(२)** सर्वे क्र. १२७/१/६ मोजमाप ४,३८१ चौरस मीटर किंवा सुमारे तेवढच गाव सोगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित आणि असलेल्या मोकळ्या शेतजमिनीचे सर्व तुकडे;
**(३)** सर्वे क्र. १२७/१/१० मोजमाप ४,०१५ चौरस मीटर किंवा सुमारे तेवढच गाव सोगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित आणि असलेल्या मोकळ्या शेतजमिनीचे सर्व तुकडे;
**(४)** सर्वे क्र. १२७/१/१३ मोजमाप ४,१०६ चौरस मीटर किंवा सुमारे तेवढच गाव सोगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित आणि असलेल्या मोकळ्या शेतजमिनीचे सर्व तुकडे;
अलिबाग-थळ वायशेत-कार्ले खिंड या सार्वजनिक रस्त्यावरुन वर चार जमीनीला आत जाण्याच्या आणि बाहेर येण्याच्या शेजारची जमीन सर्वे क्र. १२७/१/१८ चा भाग असलेला ९ मीटर रुंद खाजगी रस्त्यावर निरंतर अधिकारासह.

**दुसऱ्या परिशिष्ट**
**(मालमत्ता २ चे वर्णन)**

**(१)** सर्वे क्र. १२७/१/५ मोजमाप ४,०३० चौरस मीटर किंवा सुमारे तेवढच गाव सोगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित आणि असलेल्या मोकळ्या शेतजमिनीचे सर्व तुकडे;
**(२)** सर्वे क्र. १२७/१/९ मोजमाप ४,०२४ चौरस मीटर किंवा सुमारे तेवढच गाव सोगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित आणि असलेल्या मोकळ्या शेतजमिनीचे सर्व तुकडे;
**(३)** सर्वे क्र. १२७/१/१२ मोजमाप ४,३१७ चौरस मीटर किंवा सुमारे तेवढच गाव सोगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित आणि असलेल्या मोकळ्या शेतजमिनीचे सर्व तुकडे;
अलिबाग-थळ वायशेत-कार्ले खिंड या सार्वजनिक रस्त्यावरुन वर तीन जमीनीला आत जाण्याच्या आणि बाहेर येण्याच्या शेजारची जमीन सर्वे क्र. १२७/१/१८ चा भाग असलेला ९ मीटर रुंद खाजगी रस्त्यावर निरंतर अधिकारासह.

**सिरिल अमरचंद मंगलदास** करिता
सही/-
**रिषीराज भट्ट**
(भागीदार)

दिनांक: ०२-०९-२०२४

## सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, द्रोणागिरी येथील खालील नमूद केलेली जमीन **मूळ भूधारक कै. शंकर शांतू पाटील (मयत) यांचे वारस नामदेव शंकर पाटील व इतर** यांचेकडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.
भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

| अ. क्र. | गाव / निवाडा क्र. / युनिट केस क्र. | सर्व्हे/ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | वाटपपत्र व करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वाटपपत्र व करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | करळ ९९/९१-९२ | १८/५ | ०-१९-० | ३६६.६२ चौ.मी. पुर्णांकात ३५० चौ.मी. | भूखंड क्र. १२६, सेक्टर-५३, क्षेत्र-३५० चौ.मी. | **निवाड्यावरील सी सी प्रमाणे नावे कै. शंकर शांतू पाटील (मयत)** यांचे वारस नामदेव शंकर पाटील व इतर | प्रस्तावित भूखंडाविरोधात SCS-१७०/२०१६ दावा प्रलंबित असून इतर अन्य दावा अथवा मनाई हुकूम आदेश नाहीत. Status Report चे अवलोकन केले असता सिडकोविरोधात कोणताही मनाई हुकूम आदेश पारित नाहीत. सदर दाव्यांची पुढील तारीख २९/०८/२०२४ रोजीची आहे. |
| | | २०/४ | ०-०९-९ | | | | |
| | | ३३/२अ | ०-०५-३ | | | | |
| | | ३३/२ब | ०-०७-७ | | | | |
| | | **एकूण क्षेत्र** | **४-१९-०** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहेत, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येणार असून अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण)**
सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
**सिडको/जनसंपर्क/२०२/२०२४-२५**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स**



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. प्रकाश महादु बनसोडे व इतर | १४७/२ | २-०३-०० | . |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०१/०९/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड. मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसव्दारे सुचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली श्री. अरूण दुंदा बदे व मंगल दुंदा बदे यांचे मालकीची मिळकत आमचे अशिल श्री. नागराज अधिराघवराव नल्लू यांनी कायम खरेदी खतामार्फत विकत घेण्याचे ठरविले आहे, तरी सदर मिळकती संदर्भात कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक इत्यादी यांना गहाण, दान, बक्षीस, किंवा लीन किंवा इतर कोणताही बोजा किंवा इतर कोणताही हक्क, अधिकार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर योग्य त्या पुराव्यानीशी संपर्क साधावा व लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल निम्न उल्लेखित मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट**

तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, दुय्यम निबंधक कर्जत, मांडवणे ग्रामपंचायत हद्दीतील मौजे मांडवणे, सर्व्हे क्रमांक २०, हिस्सा क्रमांक २/अ/३, क्षेत्रफळ 0हे-३३आर-00 प्रति पैकी विकत देण्यात येणारे क्षेत्र 0हे-३३आर-00 प्रति, आकार ०.१८ रू. पैसे, भोगवटादार वर्ग क्रमांक २ ची जमीन मिळकत.

**कुमारी सुप्रिया शशिकांत विचारे,**
कायदेशीर सल्लागार,
U-70 अक्षर बिझनेस पार्क
सेक्टर १९f,
वाशी-तुर्भे रोड नवी मुंबई ४००७०३
मोबाईल नंबर ९१६७०८२६०७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसव्दारे सुचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली श्री. गौरव प्रवीण मोदी व नीरज नितीन औरंगाबादवाला यांचे मालकीची मिळकत आमचे अशिल श्री. नागराज अधिराघवराव नल्लू यांनी कायम खरेदी खतामार्फत विकत घेण्याचे ठरविले आहे, तरी सदर मिळकती संदर्भात कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक इत्यादी यांना गहाण, दान, बक्षीस, किंवा लीन किंवा इतर कोणताही बोजा किंवा इतर कोणताही हक्क, अधिकार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर योग्य त्या पुराव्यानीशी संपर्क साधावा व लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल निम्न उल्लेखित मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट**

तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, दुय्यम निबंधक कर्जत, मांडवणे ग्रामपंचायत हद्दीतील मौजे मांडवणे, सर्व्हे क्रमांक २१, हिस्सा क्रमांक ६, क्षेत्रफळ 0हे-४६आर-00 प्रति पैकी विकत देण्यात येणारे क्षेत्र 0हे-२३आर-00 प्रति, आकार ०.१६ रू. पैसे, भोगवटादार वर्ग क्रमांक १ ची जमीन मिळकत.

**कुमारी सुप्रिया शशिकांत विचारे,**
कायदेशीर सल्लागार,
U-70 अक्षर बिझनेस पार्क
सेक्टर १९f,
वाशी-तुर्भे रोड नवी मुंबई ४००७०३
मोबाईल नंबर ९१६७०८२६०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून श्री. राहुल परेशभाई पटेल रा. १००६ ई, १० वा मजला, श्रीजी गार्डन, वालिवली, बदलापूर, ठाणे. ४२१५०३. मो.नं. ९८९२०७६७४४ यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे- नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत.**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| नारायण जगन्नाथ लवाटे | ६३ | २ | ०-१३-४० | ० | ०९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :-०२-०९-२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

**निवडक**

## प्रियांशचा पराक्रम

**नवी दिल्ली :** दक्षिण दिल्ली सुपरस्टार्स संघाने शनिवारी दिल्ली प्रीमियर लीगमध्ये मोठी कामगिरी केली. उत्तर दिल्ली स्ट्रायकर्सविरुद्धच्या सामन्यात सुपरस्टार्सच्या संघाने २० षटकांत विक्रमी ३०८ धावा केल्या. कोणत्याही टी-२० लीगमधील ही सर्वोच्च धावसंख्या आणि एकूण टी-२० क्रिकेटमधील दुसरी सर्वोच्च धाव संख्या आहे. या सामन्यात सुपरस्टार्सचा कर्णधार आयुष बडोनीने ५५ चेंडूत १६५ धावांची खेळी केली. तर युवा फलंदाज प्रियांश आर्यनेही ५० चेंडूत १२० धावा करण्याचा पराक्रम केला.

## समित द्रविडची निवड

**मुंबई :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या बहु-स्वरूपातील घरच्या मालिकेसाठी अंडर-१९ संघांची घोषणा केली. दोन्ही संघात माजी भारतीय फलंदाज आणि मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा मुलगा समित द्रविडची निवड करण्यात आली आहे. ही मालिका २१ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. यामध्ये पाँडेचेरीमध्ये ३ एकदिवसीय सामने आणि चेन्नईमध्ये २ चार दिवसीय सामने खेळवले जातील. उत्तर प्रदेशच्या मोहम्मद अमानकडे वनडे संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे.

## विनेश सुवर्ण मंदिरात

**पंजाब :** ऑलिम्पियन विनेश फोगाट सुवर्ण मंदिरात दर्शनासाठी पोहोचली. २०२४ च्या ऑलिम्पिकमध्ये पदक हुकलेल्या विनेशने सुवर्ण मंदिरात डोके टेकवून गुरूंच्या चरणी नतमस्तक झाली. तीला गुरुंचे आशीर्वाद मिळाले. शिरोमणी गुरुद्वारा व्यवस्थापन समितीने विनेशचा गौरव केला. श्री दमदमा साहिबचे जथेदार ग्यानी हरप्रीत सिंग यांच्यावतीने सुवर्ण मंदिराचे मॉडेल देऊन विनेशचा सन्मान करण्यात आला. येथे येण्याचे स्वप्न होते, जे आज पूर्ण झाले आहे, असे विनेशने स्पष्ट केले.

## सूर्यकुमार दुखापतग्रस्त

**मुंबई :** दुलीप ट्रॉफीद्वारे भारतीय कसोटी संघात पुनरागमनाचा मार्ग शोधत असलेला सूर्यकुमार यादव दुखापतग्रस्त झाला आहे. शनिवारी बुची बाबूला या स्पर्धेत तामिळनाडूविरुद्ध क्षेत्ररक्षण करताना त्याच्या हाताला दुखापत झाली. तो दुलीप ट्रॉफीमध्ये सहभागी होऊ शकेल की नाही. याबाबत फारशी माहिती नाही. मुंबईसाठी हा सामना काही खास नव्हता आणि तामिळनाडूच्या ३७९ धावांना प्रत्युत्तर देताना संघ पहिल्या डावात १५६ धावांत सर्वबाद झाला. या डावात सूर्यकुमारने ३८ चेंडूत ३० धावा केल्या.

## जॉन्टीला तुटकी सीट

**नवी दिल्ली :** भारतीय विमान कंपनी एअर इंडियाने दक्षिण आफ्रिकेचा माजी क्षेत्ररक्षक जॉन्टी रोड्सला तुटलेली सीट दिली. एवढेच नाही, तर बोर्डिंगपूर्वी त्यांना पत्रावर सही करायला लावली. तसेच विमानाला उशीर झाल्याने माजी क्रिकेटपटूला मुंबई विमानतळावर दीड तास थांबावे लागले. वास्तविक जॉन्टी मुंबईहून दिल्लीला जात होता. यावेळी त्याला प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला.५५ वर्षीय रोड्सने रविवारी एक्स पोस्टद्वारे आपली वेदना व्यक्त केली. विमान कंपनीने आपले मत नोंदवलेले नाही.

### सीएसकेच्या दिग्गज खेळाडूचा

# क्रिकेटला रामराम

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
**चेन्नई सुपर किंग्सकडून एक काळ गाजवलेला खेळाडू ड्वेन ब्राव्होने आता निवृत्ती जाहीर केली आहे. गेल्या ४ वर्षात ब्राव्होने वेगवेगळ्या फॉरमेटमधून तिसऱ्यांदा निवृत्तीची घोषणा केली आहे. ही निवृत्ती त्याने त्याच्या देशातील लीगमधून घेतली आहे. वेस्ट इंडिज क्रिकेट संघाचा अष्टपैलू खेळाडू ड्वेन ब्राव्होने कॅरेबियन प्रीमियर लीगमधून निवृत्ती जाहीर केली आहे. ब्राव्होसाठी हा शेवटचा सीपीएल हंगाम असेल.**

ड्वेन ब्राव्हो या लीगमध्ये त्रिनबागो नाइट रायडर्सकडून खेळत आहे. ब्राव्होने त्याच्या सोशल मीडियावर निवृत्तीची माहिती दिली आहे. निवृत्तीची घोषणा करताना ब्राव्हो म्हणाला, हा एक चांगला प्रवास आहे आणि मी माझ्या कॅरेबियन लोकांसमोर माझी अंतिम व्यावसायिक स्पर्धा खेळण्यास उत्सुक आहे. ही अशी जागा आहे जिथे सर्व काही माझ्यासाठी सुरू झाले आणि फक्त माझ्या टीमसोबतच संपेल. पाच सीपीएल विजेतेपद जिंकल्यानंतर ब्राव्हो या लीगमधून निवृत्त होत आहे. ब्राव्होने त्याच्या नेतृत्वाखाली टीकेआरला तीनदा विजय मिळवून दिला आहे. इतकेच नाही तर ब्राव्हो सीपीएलच्या इतिहासात सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाजही आहे. ब्राव्होने सीपीएलमध्ये एकूण १२८ विकेट घेतल्या आहेत.




ड्वेन ब्राव्होने २०१३ मध्ये त्रिनबागो नाईट रायडर्सकडून सीपीएल कारकिर्दीची सुरुवात केली. त्याने 2020 पर्यंत नेतृत्व केले. यादरम्यान तो १०० सीपीएल विकेट घेणारा पहिला गोलंदाज ठरला. पुढील दोन हंगामात २०२१ आणि २०२२ मध्ये तो सेंट किट्स आणि नेव्हिस पॅट्रियट्सकडून खेळला. यानंतर तो पुन्हा २०२३ मध्ये नाइट रायडर्समध्ये परतला. ड्वेन ब्राव्हो एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आणि एक मजबूत प्रशिक्षकही आहे. अलीकडेच ब्राव्हो अफगाणिस्तान क्रिकेट संघाशी कोचिंग स्टाफ म्हणून जोडला गेला होता. त्याच्या मार्गदर्शनाखाली अफगाणिस्तानने टी-२० विश्वचषकात दमदार कामगिरी केली होती. तो इंडियन प्रीमियर लीगमध्ये प्रशिक्षक म्हणून दिसला. या लीगमध्ये अनेक फ्रँचायझींसोबत खेळाडू म्हणून खेळला होता.

## इंग्लंडच्या जो रुटने श्रीलंकेविरुध्द शतक ठोकले

**। कोलंबो । वृत्तसंस्था ।**
जो रूट सध्या उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. त्याने श्रीलंकेविरुद्धच्या कसोटीत सलग दुसऱ्या सामन्यात शतक झळकावत विक्रमांची रांग लावली आहे. जो रूट इंग्लंडसाठी सर्वाधिक कसोटी शतके झळकावणारा फलंदाज ठरला आहे. त्यांने श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या डावात १४३ धावांची खेळी केली होती. दुसऱ्या डावातही त्याने १०३ धावा केल्या आणि लंकेविरुद्धच्या कसोटी सामन्याच्या दोन्ही डावात शतके झळकावली. त्याचे कसोटी क्रिकेटमधील हे ३४ वे शतक आहे. यासह तो इंग्लंडकडून कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकावणारा खेळाडू बनला आहे. त्याने ॲलिस्टर कुकचा विक्रम मोडला आहे. रुटने कसोटी क्रिकेटमध्ये ३४ शतके झळकावली आहेत. त्याचवेळी कुकने कसोटीत ३३ शतके झळकावली होती.



### इंग्लंडसाठी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके ठोकणारे फलंदाज

**जो रूट ३४ शतके, ॲलिस्टर कुक ३३ शतके, केविन पीटरसन २३ शतके, वॅली हॅमंड २२ शतके, कॉलिन कॉर्डरे २२ शतके, जो रूट कसोटी क्रिकेटच्या इतिहासात लॉर्ड्सवर सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला आहे. सर्व फलंदाजांना मागे टाकत त्याने पहिले स्थान मिळवले आहे. रुटने लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर २०१५ कसोटी धावा करण्याचा ग्रॅहम गूचचा विक्रम मोडीत काढला आहे. आता रूटने लॉर्ड्सच्या मैदानावर २०२२ कसोटी धावा केल्या आहेत. तसेच लॉर्ड्सवरील कसोटीच्या दोन्ही डावात शतके झळकावणारा जो रूट हा चौथा फलंदाज ठरला आहे.**

## भारतीय वंशाचा आयुष हाँगकाँग क्रिकेट संघात चमकला

**। हाँगकाँग । वृत्तसंस्था ।**
क्रिकेट संघाने आश्चर्यकारक कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक आशिया पात्रता स्पर्धेच्या सामन्यात हाँगकाँगने मंगोलियावर ९ गडी राखून विजय मिळवला. आश्चर्याची बाब म्हणजे हाँगकाँगने हे लक्ष्य अवघ्या १० चेंडूत पूर्ण केले. या सामन्यात हाँगकाँगसमोर विजयासाठी १८ धावांचे लक्ष्य होते. दरम्यान भारतीय वंशाचा वेगवान गोलंदाज आयुष शुक्लाने आपल्या दमदार गोलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधले. त्याने या सामन्यात चार षटकं गोलंदाजी करताना एकही धाव ने देता एक विकेट घेऊन इतिहास घडवला आहे.



२०२१ साली कूलिज येथे झालेल्या टी-२० विश्वचषक अमेरिका क्षेत्र पात्रता सामन्यात साद जफरने पनामा विरुद्ध ४-४-०-२ असा स्पेल टाकला होता. लॉकीने टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये पापुआ न्यू गिनीविरुद्ध ही कामगिरी केली होती.

पापुआ न्यू गिनीविरुद्ध, लॉकीने ४-४-०-३ अशा जादुई आकड्यांसह सामना संपवला होता.

### आयुष शुक्लाची ऐतिहासिक कामगिरी

**हाँगकाँगकडून एहसान खानने पाच धावांत चार बळी घेतले. अनस खान आणि यासीम मुर्तझा यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. मात्र, या सगळ्यात ४ षटकांत एकही धाव न देता एक विकेट घेणाऱ्या वेगवान गोलंदाज आयुष शुक्लाने सर्वांचे लक्ष वेधले. भारतीय वंशाचा आयुष शुक्ला आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये त्याच्या चारही षटके मेडन टाकणारा तिसरा गोलंदाज ठरला आहे. याआधी केवळ साद बिन जफर (कॅनडा) आणि लॉकी फर्ग्युसन (न्यूझीलंड) यांनी हा पराक्रम करु दाखवला आहे.**

## पाकचा बब्बर शेर; प्रत्येक सामन्यात गारद

### ५० धावा करताना होतेय दमछाक

**। इस्लामाबाद । वृत्तसंस्था ।**
बांगलादेश विरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यातही पाकिस्तानचा बब्बर शेर बाबर आझम अपयशी ठरला आहे. बांगलादेश विरुद्धच्या मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यात तो पहिल्या डावात शून्य आणि दुसऱ्या डावात अवघ्या २२ धावांवर बाद झाला होता. रावळपिंडीतील दुसऱ्या कसोटी सामन्यात त्याने चांगली सुरुवात केली. पण ७१ चेंडूंचा सामना करून तो ३१ धावांवरच माघारी फिरला. मागील १५ डावात त्याच्या भात्यातून ५० पेक्षा अधिक धावा आल्याचे पाहायला मिळालेले नाही. बाबर आझमला बांगलादेश विरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात मोठ्या खेळीसह ४ हजार धावांचा टप्पा पार करण्याची संधी आहे.



यासाठी त्याला फक्त ८० धावांची आवश्यकता आहे. दुसऱ्या कसोटी सामन्याआधी त्याच्या खात्यात ५३ कसोटी सामन्यात ३९२० धावा जमा होत्या. यात आता फक्त ३१ धावांची भर पडली असून अजूनही त्याला हा पल्ला गाठण्यासाठी ४९ धावांची आवश्यकता आहे. त्याचा फॉर्म बघता हा टप्पा तो या मालिकेत पूर्ण करेल, असे वाटत नाही. बाबर आझमच्या भात्यातून अखेरचे कसोटी शतक हे २०२२ मध्ये आले होते. कराची कसोटी सामन्यात न्यूझीलंड विरुद्ध त्याने २६ डिसेंबर २०२२ रोजी १६१ धावांची खेळी केली होती. त्यानंतर त्याच्या भात्यातून शतक पाहायला मिळालेले नाही. बांगलादेश विरुद्धच्या कसोटी मालिकेतही तो संघर्ष करताना दिसत आहे. मागील १५ डावातील आकडेवारी थक्क पाहता या शतकानंतर तो अर्धशतकी आकडाही गाठू शकलेला नाही.

बाबर आझमने मागील १५ डावात ज्या धावा केल्या आहेत तो आकडा थक्क करून सोडणारा आहे. ३१, २२, ०,२३, २६, ४१, १, १४, २१, ३९, २४, १४, २४, २७ आणि १३ अशा धावा काढल्या असून चाहते नाराज झाले आहेत.

### विभागीय कॅरम स्पर्धेसाठी

## वेदांत, सार्थक यांची निवड

**सिंधुदुर्ग :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व क्रीडा परिषद सिंधुदुर्गमार्फत कुडाळ येथे जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा पार पडली. कासार्डे ज्युनिअर कॉलेजमधील बारावी सायन्सचा खेळाडू वेदांत वायंगणकर याने १९ वर्षे वयोगटात पाचवा क्रमांक पटकावला. १४ वर्षे वयोगटात सहावीतील सार्थक वायंगणकर याने तृतीय क्रमांक मिळविला. या दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले जात आहे. या खेळाडूंची कोल्हापूर विभागीय शालेय कॅरम स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

## रुबिनाची नेमबाजीत कांस्यपदकावर मोहर

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**
रुबिना फ्रान्सिसने चमकदार कामगिरी करत पॅरालिम्पिक २०२४ च्या तिसऱ्या दिवशी पाचवे पदक जिंकून दिले. रुबिनाने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल एसएचवन फायनलमध्ये २११.१ स्कोअरसह कांस्यपदक जिंकले.

रुबिनाने पात्रता फेरीत सातवे स्थान पटकावले होते, मात्र तिने अंतिम फेरीत दमदार कामगिरी केली. या पॅरालिम्पिकमधील नेमबाजीतील भारताचे हे चौथे पदक आहे. रुबिनाच्या आधी अवनी लेखरा हिने महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टँडिंग एसएसवन स्पर्धेत भारतासाठी सुवर्णपदक जिंकले आहे, तर मोनाने कांस्यपदक जिंकले. त्याचवेळी मनीष नरवालने पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल एसएचवन प्रकारात रौप्य पदक जिंकले आहे.२५ वर्षीय रुबिना पात्रता फेरीत अव्वल आठ नेमबाजांपेक्षा मागे पडली होती, पण तिने शेवटी वेग दाखवला आणि पदकाची शर्यत गाठली. तिने पात्रता फेरीत ५५६ गुणांसह सातवे स्थान मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला होता. मध्य प्रदेशातील ही नेमबाज तीन वर्षांपूर्वी टोकियो पॅरालिम्पिकच्या पात्रता फेरीत सातव्या स्थानावर राहिली होती. त्यानंतर अंतिम फेरीतही सातव्या स्थानावर राहिली होती, पण पॅरिसमध्ये रुबिनाने टोकियोच्या अपयश मागे सोडत कांस्यपदक मिळवले आहे. बॅडमिंटनमधील भारताचे पदक निश्चित झाले आहे. सुकांत कामने थायलंडच्या सिरपॉन्गचा २१-१२, २१-१२ असा पराभव केला. त्यांनी उपांत्य फेरी गाठली आहे. सुकांतसोबत सुहासनेही पात्रता मिळवली आहे. मनदीप कौरने बॅडमिंटन महिला एकल एसएलथ्रीमधील गट ब सामना जिंकला आहे. मनदीपसमोर ऑस्ट्रेलियाच्या सेलीन विनॉटचे आव्हान होते. मनदीपने हा सामना २१-२३, २१-१०, २१-१७ असा जिंकला.



भारतीय पॅरा सायकलपटू अर्शद शेखने पुरुषांच्या टाइम ट्रायल पात्रतेमध्ये ११वे स्थान पटकावले आणि त्याला अंतिम फेरीत स्थान मिळवता आले नाही. या स्पर्धेत अव्वल सहा क्रमांक मिळवणारे खेळाडू अंतिम फेरीसाठी पात्र ठरतात.

## राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

### हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिवसाचे औचित्य

**। खोपोली । प्रतिनिधी ।**
हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून खोपोली शहरातील कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुलात राष्ट्रीय क्रीडा दीन उत्साहात साजरा झाला.

महाराष्ट्र राज्य कुस्ती प्रशिक्षक संदीप वांजळे यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रमाणे प्रत्येकाने समर्पित भावनेने आणि खेळाशी समरस होऊन सराव करणे गरजेचे आहे, असे सांगताना आगामी काळात होणाऱ्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन जास्तीत जास्त पदक प्राप्त करण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवावे लागेल असा आशावाद व्यक्त केला. कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यासाचे अध्यक्ष राजाराम कुंभार, क्रीडा शिक्षक जगदीश मरागजे, खालापूर तालुका कुस्तीगीर संघाचे सदस्य गुरुनाथ साठेलकर, आंतरराष्ट्रीय खेळाडू विजेंद्र सिंग यांनीही यावेळी कुस्तीगीरांना मार्गदर्शन केले. कुस्ती प्रशिक्षक विजय चव्हाण, रायगड श्री दिवेश पलांडे तसेच पूजा मरागजे, ज्योती शिंदे यांच्यासह पालकवर्ग देखील उपस्थीत होता.

स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडियाकडून आयोजित इंटर ट्रेनिंग सेंटर ट्रायलमध्ये राष्ट्रीय स्तरावर निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार यावेळी करण्यात आला. वैष्णवी कुंभार, कनक मरागजे, सई शिर्के, राणी साहा, प्रणाली घनवट, आस्था मरागजे, राहुल पाईकराव या खेळाडूंनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. रोशनी परदेशी यांनी सूत्र संचालन तर प्रांजली कुंभार हीने आभार प्रदर्शन केले.

### जॉडी ग्रिनहॅमची कामगिरी प्रेरणादायी...

# गर्भवती खेळाडूने जिंकले कांस्यपदक

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**
**पॅरा ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी गर्भवती पॅरा-तिरंदाज जॉडी ग्रिनहॅमने महिलांच्या वैयक्तिक कंपाऊंड मध्ये पॅरालिंपिक्स जीबी संघ सहकारी आणि गतविजेत्या फोबी पॅटरसन पेनला हरवून कांस्यपदक जिंकले. ग्रिनहॅम सात महिन्यांची गर्भवती असून देखील तीने कांस्यपदकावर नाव कोरले आहे. तीने केलेली उत्तुंग कामगिरी ही इतर अनेक मातांना प्रेरणादायी ठरणार आहे.**

जॉडी ग्रिनहॅमचा जन्म झाला तेव्हा तिच्या डाव्या हाताला बोटं नव्हती. फक्त अर्धा अंगठा होता. तिला दोन वर्षांचा मुलगा आहे. याआधी ती तीनदा गरोदर राहूनही ती आई होऊ शकली नव्हती. अशा परिस्थितीत गर्भधारणेदरम्यान तिरंदाजी करणे केवळ शारीरिकच नाही तर मानसिकदृष्ट्याही कठीण असते. सेमीफायनल सामन्यादरम्यान ग्रिनहॅमला खूप त्रास झाला. या सामन्यादरम्यान तिचे मूल पोटात हालचाल करत होते आणि ती हरली. त्यामुळे तिला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

पॅरालिम्पिकमध्ये पदक जिंकण्यापूर्वी तिने शनिवार व रविवार पॅरिसमधील रुग्णालयात घालवला होता. कारण तिचे बाळ हालचाल करत नव्हते. तिच्या मुलाच्या हृदयावर सतत लक्ष ठेवण्यात येत होते. प्रशिक्षणादरम्यान, ती मुलाच्या अनपेक्षित हालचालींची तयारीही करत होती. ती आता तिच्या मुलाला सांगू शकणार आहे की, जगात येण्यापूर्वीच तो पोडियमवर पोहोचला होता. ग्रिनहॅमने तिच्याच देशाची ॲथलीट फोबी पॅटरसन पाइन हिला पराभूत करून कांस्यपदकाची कमाई केली.

दोघीही एकमेकांच्या चांगल्या मैत्रिणी आहेत. ३१ वर्षीय जॉडीने कांस्यपदक जिकून इतिहास घडवला. गर्भवती महिलांना संदेश देताना ती म्हणाली, आयुष्यात तुम्हाला जे करायचं ते करा, जर तुम्ही आनंदी, निरोगी असाल आणि बाळ निरोगी, सुरक्षित असेल, तर तुम्ही तुमचे कोणतेही काम करत राहू शकता. यामध्ये कोणतीही अडचण येत नसल्याचे ती म्हणाली.



## षटकात दोन बाउन्सर नियमाचा घेणार आढावा

### आयपीएलमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
बीसीसीआयने काही वर्षांपूर्वी आयपीएल आणि स्थानिक क्रिकेट स्पर्धांमध्ये काही नवे नियम लागू केले होते. नव्या नियमात एका षटकात दोन बाउन्सर टाकण्याची मुभा देण्यात आली होती. वेगवान गोलंदाजांसाठी ही संधी होती. याच दोन नियमांचा आता आढावा घेण्यात येणार आहे.

या नियमांमध्ये आता बदल करण्याबाबत चर्चा सुरू आहे. वृत्तानुसार, बीसीसीआय आता मइम्पॅक्ट प्लेअरफ नियमासह एका षटकात दोन बाउन्सरच्या नियमाचा फेरविचार करु शकते.गेल्या सत्रात देशांतर्गत क्रिकेटमध्ये दोन बाउन्सर नियम लागू केल्यानंतर, बीसीसीआयने आयपीएलमध्येही त्या नियमाची अंमलबजावणी केली होती. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये मात्र गोलंदाजाला एका षटकात एकच बाउन्सर टाकण्याची परवानगी आहे. आयपीएल आणि स्थानिक क्रिकेटमध्ये एक गोलंदाज एका षटकात जास्तीत जास्त दोन बाउन्सर टाकू शकतो. आयपीएलमधील मइम्पॅक्ट प्लेअरफ नियम हा चर्चेचा केंद्रबिंदू आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)